cmyk

## संपादकीय

### युद्धविराम : काही न मारताच पाकिस्तानचे दात पाडले

भारताने ७ मे रोजी ‘ऑपरेशन सिंदूर’ अंतर्गत पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी तळांवर हल्ले करत दहशतवादाला चोख प्रत्युत्तर दिले. यानंतर १० मे रोजी भारत आणि पाकिस्तानात शस्त्रसंधी लागू झाली. या चार दिवसांच्या तीव्र संघर्षात दोन्ही देशांना मोठे नुकसान सहन करावे लागले असल्याचे विविध वृत्तांनुसार समजते.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### निवडक हवाई मार्गांवरील वाहतुकीला १५ मे पर्यंत स्थगिती

नवी दिल्ली : भारतीय विमानतळ प्राधिकरण आणि संबंधित हवाई वाहतूक प्राधिकरणांनी वैमानिकांसाठी सूचना जारी केल्या आहेत. या सूचनेनुसार भारताच्या उत्तर आणि पश्चिम भागातील ३२ विमानतळांवरील सर्व नागरी विमान उड्डाणे १५ मे पर्यंत तात्पुरती बंद ठेवली जाणार आहेत. अधमपूर, अंबाला, अमृतसर, अवंतीपूर, बठिंडा, भुज बिकानेर, चंदीगड, हलवारा, हिंडन, जैसलमेर, जम्मू, जामनगर, जोधपूर, कांडला, कांग्रा (गग्गल), केशोद, , शनगड, कुल्लू मनाली (भुंतर), लेह, लुधियाना, मुंद्रा, नलिया, पठाणकोट, पटियाला, पोरबंदर, राजकोट (हिरासर), सरसावा, शिमला, श्रीनगर, थॉईस आणि उत्तरलाई यी विमानतळांवरील वाहतूक विस्कळीत होणार आहे.

बीड - महाराष्ट्र वर्ष-५ अंक-२१ रविवार, दि.११ मे २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने-६ किंमत ३ रूपये

# पीकविमा भरपाईचे ३७२० कोटी रुपये मिळणार

## शेतकऱ्यांच्या खात्यात ३१२६ कोटी जमा

**पुणे । प्रतिनिधी**

**खरिप हंगाम २०२४ मध्ये पीक नुकसानीपोटी शेतकऱ्यांना एकूण ३ हजार ७२० कोटी रुपये विमा भरपाई मंजूर झाली. त्यापैकी ९ मेपर्यंत ३ हजार १२६ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले. आणखी ३०७ कोटी रुपये शेतकऱ्यांना लगेच मिळणार आहेत. तर २८८ कोटी रुपये राज्याने विम्याचा दुसरा हप्ता दिल्यानंतर मिळणार आहेत.**

शेतकऱ्यांना सध्या खरिप हंगाम २०२४ मधील वेगवेगळ्या ट्रीगरमधून भरपाई मंजूर करण्याचे काम सुरु आहे. तर राज्य सरकारने आपल्या हिस्स्याचा पहिला हप्ता विमा कंपन्यांना दिल्यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यात स्थानिक नैसर्गिक अपत्ती आणि हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या दोन ट्रीगरमधून भरपाई जमा केली जात आहे. काढणी पश्चात नुकसान भरपाई आणि पीक कापणी प्रोयागावर आधारित नुकसान भरपाई राज्याने आपला दुसरा हप्ता विमा कंपन्यांना दिल्यानंतर शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाईल. शेतकऱ्यांना स्थानिक नैसर्गिक अपत्ती, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती, काढणी पश्चात नुकसान भरपाई आणि पीक कापणी प्रोयागावर आधारित नुकसान भरपाई मंजूर झाली आहे. या ४ ही ट्रीगरमधून शेतकऱ्यांना ९ एप्रिलपर्यंत ३ हजार ७२० कोटी रुपये भरपाई मंजूर करण्यात आली. पण राज्याने केवळ पहिला हप्ता दिल्यामुळे नियमानुसार कंपन्या पान २ वर




### भारतीय सैनिकांसाठी बीडमध्ये आज मोटरसायकल तिरंगा रॅली

## देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे-शेख निजाम

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय सैनिकांचे मनोबल वाढविण्यासाठी रविवार दि.११ मे २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता बीडमध्ये मोटार सायकल रॅली काढण्यात येणार आहे. एक देशभक्त, भारतीय नागरिक म्हणून ही रॅली काढण्यात येणार आहे. यामध्ये देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शेख निजाम यांनी केले आहे.

भारतीय सैनिकांनी जम्मू कश्मीर मधील पहलगाम हल्ल्यानंतर ‘ऑपरेशन सिंदूर’ राबवत पाकिस्तानवर एअरस्ट्राइक करत प्रत्युत्तर देऊन अनेक दहशतवादी अड्डे उद्धवस्त केले. पहलगामच्या हल्ल्यातील नागरिकांच्या जखमा ओल्या असताना क्षणार्धात पान २ वर

# अखेर भारत-पाकिस्तानमध्ये शस्त्रसंधी!

## अमेरिकेची मध्यस्थी, डोनाल्ड ट्रम्प यांनी केली घोषणा



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत-पाकिस्तान युद्धबंदीची घोषणा केली: २२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर दोन्ही देशांमधील तणाव वाढल्यानंतर भारत आणि पाकिस्तानने शनिवारी संध्याकाळी ५ वाजल्यापासून गोळीबार आणि लष्करी कारवाई थांबवण्यावर सहमती दर्शवली. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री म्हणाले, पाकिस्तानच्या डीजीएमओंनी दुपारी ३.३५ वाजता डीजीएमओला फोन केला. त्यांनी संध्याकाळी ५ वाजल्यापासून दोन्ही बाजूंनी हवाई आणि समुद्रातून सर्व गोळीबार आणि लष्करी कारवाई थांबवण्यावर सहमती दर्शविली.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर पोस्ट करीत म्हटले की, अमेरिकेच्या मध्यस्थीने रात्रीच्या दीर्घ चर्चेनंतर, मला हे जाहीर करताना आनंद होत आहे की भारत आणि पाकिस्तान पूर्ण आणि तात्काळ युद्धबंदीवर सहमत झाले आहेत. सामान्य ज्ञान आणि उत्तम बुद्धिमत्ता वापरल्याबद्दल दोन्ही देशांचे अभिनंदन. या प्रकरणाकडे लक्ष दिल्याबद्दल धन्यवाद. यासोबतच अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रु रुबियो यांनी एक्स वर पोस्ट केले, की, गेल्या ४८ तासांत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शेहबाज शरीफ, परराष्ट्र मंत्री सुब्रह्मण्यम जयशंकर, लष्करप्रमुख असीम मुनीर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि असीम मलिक यांच्यासह वरिष्ठ भारतीय आणि पाकिस्तानी अधिकाऱ्यांशी संवाद साधला आहे. ते म्हणाले, भारत आणि पाकिस्तान सरकारांनी तात्काळ युद्धबंदीवर आणि तटस्थ ठिकाणी व्यापक मुद्द्यांवर चर्चा सुरू पान २ वर

### शनिवारच्या ५ वाजल्यापासून शस्त्रसंधी लागू

भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी लगेच या घडामोडीविषयी पुष्टी केली. त्यांनी सांगितले, ‘‘पाकिस्तानच्या डायरेक्टर्स जनरल ऑफ मिलिटरी ऑपरेशन्स यांनी शनिवारी दुपारी ३:३५ वाजता भारताच्या डायरेक्टर्स जनरल ऑफ मिलिटरी ऑपरेशन्स यांना फोन केला. दोन्ही बाजूंनी भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी ५ वाजल्यापासून जमिनीवर, हवेत आणि समुद्रात सर्व प्रकारचा गोळीबार आणि लष्करी कारवाई थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला. या समझोता कराराची अंमलबजावणी करण्यासाठी दोन्ही बाजूंना सूचना देण्यात आल्या आहेत. डायरेक्टर्स जनरल ऑफ मिलिटरी ऑपरेशन्स १२ मे रोजी दुपारी १२ वाजता पुन्हा चर्चा करतील.

### कोणतीही दहशवादी कृती ही युद्धाची कृती समजली जाईल - भारताचा इशारा

भारतात भविष्यात होणारी कोणतीही दहशतवादी कृत्ये ही देशाविरुद्ध युद्धाची कृती मानली जातील आणि त्यानुसार त्याला प्रतिसाद दिला जाईल, असे उच्च सरकारी सूत्रांनी शनिवारी (१० मे २०२५) सांगितले. या निर्णयाद्वारे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार दहशतवादी घटनांविरुद्ध लाल रेषा आखण्याचा प्रयत्न करत आहे आणि गुन्हेगारांना आणि कट रचणाऱ्यांना कडक प्रत्युत्तर देण्याचा आपला हेतू स्पष्ट करत आहे, जो पाकिस्तानला एक संदेश म्हणून पाहिला जातो भारतीयांना लक्ष्य करण्यात सहभागी असलेल्या विविध दहशतवादी गटांशी जोडलेला देश.

### पाकिस्तानकडून अवघ्या ४ तासांत युद्धबंदीचे उल्लंघन ; पुन्हा ड्रोन हल्ले

भारत आणि पाकिस्तानमधील ८६ तास चाललेले युद्ध शनिवारी संध्याकाळी ५ वाजता संपले. दोन्ही देशांमध्ये युद्धबंदीवर सहमती झाली. पण त्यानंतर अवघ्या ४ तासांतच पाकिस्तानने युद्धबंदीचे उल्लंघन केले. जम्मू आणि काश्मीरमध्ये सीमेपलीकडून पाकिस्तानच्या प्रक्षोभक कारवाया पुन्हा एकदा तीव्र झाल्या. शनिवारी रात्री, पाकिस्तानने अनेक भागात युद्धबंदीचे उल्लंघन केले आणि जोरदार गोळीबार केला, तर काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यात एका संशयित ड्रोनमुळे स्फोट झाला. मिळालेल्या माहितीनुसार, पाकिस्तानने अखनूर, राजौरी आणि आरएस पुरा आंतरराष्ट्रीय सीमेवर तोफ गोळे डागल्याचे समोर आले. त्याचवेळी बारामुल्लामध्ये ड्रोन हल्ला करण्यात आला. जम्मूच्या पालनवाला सेक्टरमध्येही पाकिस्तानने शस्त्रसंधीचे उल्लंघन केले. दरम्यान, भारतीय सैन्याला चोख प्रत्युत्तर देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# मान्सून २७ मे रोजी केरळमध्ये येणार

## ●सरासरीपेक्षा अधिक १०५ टक्के पावसाचा अंदाज व्यक्त

**पुणे । प्रतिनिधी**


मान्सून देशात यंदा वेळेआधी दाखल होणार आहे. मान्सून केरळमध्ये २७ मे रोजी डेरेदाखल होईल, असा अंदाज हवामान विभागाने दिला. पोषक हवामान असल्याने मान्सून वेळेच्या आधी देशात येणार आहे. तसेच हवामान विभागाने यंदा मान्सून काळात सरासरीपेक्षा अधिक म्हणजेच १०५ टक्के पावसाचा अंदाज दिला आहे. सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज आणि वेळेआधी मान्सून दाखल होणार असल्याने शेतकऱ्यांनाही दिलासा मिळणार आहे.



मान्सून केरळमधून देशात प्रवेश करतो. तसेच केरळमध्येच मान्सून जमिनीवर येतो. मान्सून केरळमध्ये कधी येतो त्यावरून देशातील वाटचालही ठरते. केरळमध्ये दाखल झाल्यानंतर मान्सून उत्तरेच्या दिशेने वाटचाल करतो. केरळमध्ये मान्सून दाखल होण्याची सरासरी वेळ १ जून आहे. मात्र, मागील ५ वर्षांमध्ये मान्सून ३ वर्षे सरासरी वेळेपेक्षा उशीरा देशात दाखल झाला. तर २ वर्षे मान्सून वेळेच्या आधी देशात आला. यंदाही सरासरी वेळेच्या जवळपास एक आठवडा पान २ वर

# इंदिरा गांधी होना आसान नहीं!

## युद्धविरामानंतर काँग्रेस आक्रमक, मोदी सरकारवर अप्रत्यक्ष हल्ला





**नवी दिल्ली । वृतसंस्था**

गेल्या ३ दिवसांपासून सुरू असलेल्या सीमारेषेवरील गोळीबार आणि लष्करी कारवाया थांबवण्यात आल्या आहेत. भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी पत्रकार परिषद घेऊन युद्धविराम झाल्याची माहिती दिली. त्यानुसार, शनिवारी सायंकाळी ५ वाजल्यापासून भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धजन्य कारवाया थांबल्या आहेत. एकीकडे भारताने पाकिस्तान नरमला आणि युद्ध थांबले म्हणून मोदी सरकारचे कौतुक होत असतानाच दुसरीकडे दिवंगत पान २ वर

### इंदिरा गांधींचा आंतरराष्ट्रीय स्तरावरही दबदबा

अमेरिकेच्या त्यावेळच्या राष्ट्रीय सल्लागार हेनरी किसिंजर यांच्यासोबत झालेल्या बैठकीत इंदिरा गांधींनी त्यांना ठामपणे सांगितले होते की, जर अमेरिकेने पाकिस्तानला आवरले नाही तर भारताला नाईलाजाने कारवाई करावी लागेल. पूर्व पाकिस्तानचा प्रश्न ही पाकिस्तानची अंतर्गत गोष्ट आहे असे पाकिस्तान सातत्याने सांगत होते. पण इंदिरा गांधींनी स्पष्ट केले की हा प्रश्न पाकिस्तानचा अंतर्गत प्रश्न नाही. त्यामुळे भारतातील अनेक राज्यांची शांतता भंग होत आहे, असे म्हणत इंदिरा गांधींनी कोणत्याही दबावाला बळी न पडता, अत्यंत परखडपणे भुकिमा मांडली होती.

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१० मे २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २५.०० क्विंटल | २,०५० | ३,००० | २,६२१ |
| ज्वारी/हायब्रिड :५३.०० क्विंटल | १,९५० | २,७०० | २,२८९ |
| मका/लोकल:९.५० क्विंटल | २,१०० | २,१०० | २,१०० |
| तूर : ५.५० क्विंटल | ६,५०० | ६,५०० | ६,५०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: १६.०० क्विंटल | २,३०१ | २,४५० | २,३६९ |
| मुग :४.५० क्विंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: ६३.५० क्विंटल | ४,२५० | ४,२५० | ४,२५० |
| हरभरा: १.०० क्विंटल | ५,३०० | ५,३०० | ५,३०० |

## यूपीएससीची २५ मे रोजी होणारी परीक्षा पुढे ढकलणार?

### सोशल मीडियावर चर्चा

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**यूपीएससी प्रिलिम्स परीक्षा २०२५ ची तारीख जवळ येत आहे. यंदा केंद्रीय लोकसेवा आयोग ही परीक्षा २५ मे रोजी घेणार आहे. या परीक्षेसाठी नोंदणी केलेले उमेदवार आता ॲडमिट कार्ड येण्याची वाट पाहत आहेत. या परीक्षेसाठी ॲडमिट कार्ड मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात जारी होण्याची शक्यता आहे. पण सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम यूपीएससी सिव्हिल सर्व्हिस परीक्षेवर (सीएसई) देखील होऊ शकतो. यावरुन सोशल मीडियावर चर्चा सुरु आहे.**

यूपीएससी प्रिलिम्स परीक्षा २५ मे २०२५ रोजी होणार आहे. सध्याची तणावाची परिस्थिती पाहाता जर यूपीएससी प्रिलिम्स परीक्षा पुढे ढकलण्यात आली, तर यूपीएससी त्यांची अधिकृत वेबसाइट वर त्याबाबतची सूचना जारी करेल. दरम्यान, केंद्रीय लोकसेवा आयोगाने बेंचमार्क दिव्यांगत्व पान २ वर

## आमदारांशी चर्चा करूनच सुप्रियाताई निर्णय घेतील - आ.रोहित पवार



पुणे । प्रतिनिधी

‘पक्षात पुढच्या पिढीला जबाबदारी दिली पाहिजे, त्यातूनच खासदार शरद पवार यांनी सूचक वक्तव्य केले आहे. सुप्रियाताई या राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या कार्याध्यक्षा आहेत. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्रीकरणाबाबत त्या पक्षाच्या आमदारांशी चर्चा करतील. चर्चेत काय निर्णय होईल हे ज्या त्या वेळी पाहिले जाईल’’, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केले. पान २ वर

# गेवराईच्या आगारात पाच ‘लालपरी’ बस दाखल

## आ.पंडितांच्या उपस्थितीत बसचे लोकार्पण, आमदारांचा लालपरीतून प्रवास





**गेवराई । प्रतिनिधी**

**परिवहन महामंडळाने आज बीडमधील गेवराईच्या आगाराला पाच नविन ’लालपरी’बस अखेर उपलब्ध करून दिल्या आहेत. आ. विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीत या बसची विधिवत पूजन करून प्रवाशांच्या सेवेत सुपूर्द करण्यात आल्या. दरम्यान आमदार यांच्यासाठी राखीव असलेल्या असनावर बसून आ. विजयसिंह पंडितांनी काही किलोमीटर प्रवास देखील केला.**

गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ. विजयसिंह पंडित यांचे गेवराई आगारासाठी पाच नवीन ‘‘लालपरी‘‘ बस उपलब्ध कराव्यात यासाठी प्रयत्न सुरू होते. त्यांच्या प्रयत्नाला अखेर यश मिळाले असून,काल उशिरा गेवराई आगारात पाच नविन’लालपरी’बस दाखल झाल्या. शनिवार (ता.१०) मे रोजी आ विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीत लालपरी बसचे विधिवत पूजन करून प्रवाशांच्या सेवेसाठी सुपूर्द करण्यात आल्या. नवीन बस उपलब्ध झाल्यामुळे प्रवाशांना मोठ्या प्रमाणावर सुविधा पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# युद्धविराम : काही न मारताच पाकिस्तानचे दात पाडले

भारताने ७ मे रोजी 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी तळांवर हल्ले करत दहशतवादाला चोख प्रत्युत्तर दिले. यानंतर १० मे रोजी भारत आणि पाकिस्तानात शस्त्रसंधी लागू झाली. या चार दिवसांच्या तीव्र संघर्षात दोन्ही देशांना मोठे नुकसान सहन करावे लागले असल्याचे विविध वृत्तांनुसार समजते.

पाकिस्तानने नियंत्रण रेषेजवळील गावांवर केलेल्या गोळीबारात आणि ड्रोन हल्ल्यांमध्ये भारताचे लक्षणीय नुकसान झाले. जम्मू-काश्मीरमधील राजौरी येथे अतिरिक्त जिल्हा विकास आयुक्त राजकुमार थापा यांच्यासह पाच नागरिकांचा मृत्यू झाला. पुंछ, कुपवाडा आणि बारामुल्ला येथील गावांवर झालेल्या हल्ल्यांमुळे काही घरे उद्ध्वस्त झाली, तर स्थानिकांना बंकरमध्ये आश्रय घ्यावा लागला. श्रीनगर, जम्मू आणि उधमपूर येथे पहाटे स्फोटांमुळे नागरिकांमध्ये भीती पसरली. भारताने ३२ विमानतळांवरील नागरी उड्डाणे १५ मेपर्यंत बंद केली, ज्यामुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागला. तर तिकडे पाकिस्तानात 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत भारताने बहावलपूर, मुरिदके आणि सियालकोटसह नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. यात जैश-ए-मोहम्मदचा प्रमुख युसूफ अझरसह १०० हून अधिक दहशतवादी ठार झाले. भारताने लाहोरजवळील पाकिस्तानची हवाई संरक्षण यंत्रणा आणि रडार युनिट्स नष्ट केल्या. पाकिस्तानच्या हवाई दलाच्या तीन तळांवर भारतीय क्षेपणास्त्रांनी हल्ले केल्याचा दावा इस्लामाबादने केला, ज्यामुळे त्यांचे लष्करी पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले. पाकव्याप्त काश्मीरमध्ये १३ नागरिकांचा मृत्यू आणि ५० हून अधिक जखमी झाल्याचे पाकिस्तानने म्हटले.

ऑपरेशन सिंदूरनंतर भारतीय चलन रुपया अमेरिकी डॉलरच्या तुलनेत ४५ पैशांनी घसरून ८४.८० वर बंद झाला, कारण सीमापार तणावामुळे बाजारात अनिश्चितता वाढली. ३२ विमानतळांवरील नागरी उड्डाणे १५ मेपर्यंत बंद करण्यात आली, ज्यामुळे विमान कंपन्यांना कोट्यवधींचे नुकसान झाले. जम्मू-काश्मीरमधील पर्यटन क्षेत्राला मोठा फटका बसला, कारण पर्यटकांनी प्रवास रद्द केले. दुसरीकडे पाकिस्तानच्या शेअर बाजारात मोठी घसरण झाली आणि अर्थव्यवस्था आणखी खालावली. ऑपरेशन सिंदूरमुळे लाहोरची हवाई संरक्षण यंत्रणा आणि रडार युनिट्स उद्ध्वस्त झाल्याने लष्करी पायाभूत सुविधांचे कोट्यवधी डॉलरचे नुकसान झाले. सिंधु जल संधि स्थगित झाल्याने पंजाब आणि सिंध प्रांतातील शेतीवर गंभीर परिणाम होण्याची भीती आहे, ज्यामुळे खाद्य संकट आणि आर्थिक अस्थिरता वाढण्याची शक्यता आहे. एवढे सगळे नुकसान झाल्यानंतर १० मे रोजी दुपारी ३:३५ वाजता पाकिस्तानने भारताशी संपर्क साधून शस्त्रसंधीची विनंती केली. संध्याकाळी ५ वाजेपासून दोन्ही देशांनी गोळीबार थांबवला. अमेरिकेने यात मध्यस्थी केल्याचा दावा केला असला, तरी भारताने ही सहमती थेट चर्चेतून झाल्याचे स्पष्ट केले. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशस्वी अंमलबजावणीबद्दल सैन्याचे अभिनंदन केले, तर पाकिस्तानने हवाई क्षेत्र पुन्हा खुली केल्याने तेथे सामान्य परतत आहेत.

एकूणच या दोन दिवसाच्या हल्ल्याने आणि युद्धाने भारतीयांचा विश्वास वाढला आहे तर, पाकिस्तानने तो गमावला आहे. याशिवाय पाकिस्तानचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आगोदर मोठ मोठ्या गप्पा मारीत युद्धाची खुमखुमी दाखविणाऱ्याचे पाकचे केवळ तीन दिवसातच पाय जमिनीवर आले. भारताने काही न मारताच पाकिस्तानचे दात पाडले आहेत, असेच यावर म्हणावे लागेल.

---

# अंबड पालिकेचे जितेंद्र देशमुख यांचे निधन

**अंबड । प्रतिनिधी**

**अंबड नगर परिषदचे लिपिक कर्मचारी जितेंद्र राजेश्वरराव देशमुख वय ५५ वर्षे यांचे १० मे शनिवार रोजी संध्याकाळी ६ वाजेच्या दरम्यान हृदयविकाराने निधन झाले आहे . अंत्यविधी संस्कार ११मे रोजी रविवारी सकाळी ९ वाजता हिंदू स्मशानभूमी येथे होणार आहे. जितेंद्र देशमुख यांची तीन वर्षे सेवा बाकी होती. यांच्या पश्चात पत्नी व मुलगी मुलगा आई असा परिवार आहे. जितेंद्र देशमुख यांना दोन भाऊ आहे.**



जितेंद्र देशमुख हे कर्मचारी, नेहमीच हसत मुख, कोणतेही काम नगर परिषद मध्ये घेऊन येणाऱ्या नागरिकांचे नेहमी सहकार्य करण्याच काम देशमुख यांनी केलेले आहे. मागासवर्गीय समाजाचे रमाई आवास घरकुल योजना हे काम देशमुख यांच्याकडे होते, रमाई आवास घरकुल योजनेचा पदभार आल्या नंतर विशेष लक्ष देऊन देशमुख यांनी शेकडो गोर गरीब कुटुंबाना या योजनेचा लाभ मिळून दिला आहे. कधी कुणाचे काम कधीच अडवले नाही. अशा प्रामाणिक कर्मचारी म्हणून ते होते.

---

# बांगरवाडीला अध्यात्मिक केंद्राबरोबरच ज्ञान केंद्रही बनवू-आ.सुरेश धस

## श्री दत्तप्रभू व हनुमंतराय मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा नगरपंचायतीच्या हद्दीतील बांगरवाडी गावाने नव्या अध्यात्मिक व बौद्धिक पर्वाकडे वाटचाल सुरू केली आहे. येथील श्री दत्तप्रभू व महाबली हनुमंतराय यांच्या भव्य मूर्तींची प्राणप्रतिष्ठा सोहळा गुरुवारी दि. ८ मे रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात उपस्थित आ.सुरेश धस यांनी गावातील तरुणांसाठी अभ्यासिकेची निर्मिती करून 'बांगरवाडीला अध्यात्मिक केंद्राबरोबरच ज्ञान केंद्र देखील बनवू,' अशी महत्त्वपूर्ण ग्वाही दिली.या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात महंत सतीश महाराज उरणकर, ह.भ.प. लक्ष्मण महाराज सस्ते, नगरपंचायत



सभापती हनुमंत काळे, तसेच अनेक अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. यावेळी सतीश महाराजांनी रसाळ वाणीने श्री दत्तप्रभू व हनुमंत भक्तीचे महत्त्व सांगितले. सुंदरकांडाचे प्रवचन आणि विविध धार्मिक विधींनी वातावरण भारावून गेले होते.सोहळ्याच्या पूर्वसंध्येला, बुधवारच्या दिवशी गावात हनुमान व दत्तप्रभूंच्या मूर्तींची ट्रॅक्टरमधून भव्य मिरवणूक काढण्यात आली. फुलांनी सजवलेली मूर्ती, ढोल-ताशांच्या गजरात गावभर फिरवण्यात आली आणि शेकडो भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.प्रसंगी बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले, "बांगरवाडीतील तरुणांना स्पर्धा परीक्षा व विविध शैक्षणिक संधींसाठी योग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी लवकरच अभ्यासिका उभारण्यात येईल. अध्यात्म आणि विज्ञान यांचा समन्वय साधून नव्या पिढीने प्रगतीचा मार्ग स्वीकारावा.नायगावमधील जिल्हा परिषद शाळेतून शिक्षण घेतलेल्या पंकज आवटे यांनी नुकतीच केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण करून इतिहास घडवला आहे. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून तरुणांनी सातत्याने अभ्यास केला, तर यश हमखास आहे," असेही आमदार धस म्हणाले.या उपक्रमामुळे गावातील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असून, अभ्यासासाठी चांगली जागा व आवश्यक साहित्य उपलब्ध झाल्यास तरुणांना निश्चितच योग्य दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या कार्यक्रमात विठ्ठल रूपनर काळे. यांच्यासह शेकडो भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. धार्मिक, अध्यात्मिक आणि सामाजिकदृष्ट्या समृद्ध असा हा सोहळा गावाच्या सर्वांगीण प्रगतीच्या दिशेने उचललेलं एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला आहे.

---

## प्रशासन दखल घेईना; जमीन माफियांचे फावू लागले!

# बोगस कागदपत्रे तयार करून जमीन बळकावली

## आसिम जरगर, जमील कुरेशी यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील मौजे धारुर ता. धारुर जि. बीड येथील जमिन सर्वे नं. ६२२, ६२३अ, ६२३आ नामे नुरबाग मध्ये दि. १४/१०/१९९३ रोजी मा. सहायक संचालक नगर रचना शाखा बीड यांनी सर्वे नं. ६२२, ६२३अ, ६२३आ मध्ये कोणतीही अंतिम ए ने लेआऊट ची मंजुरी दिली नसतांना सदर सर्वे नं. ६२२ मधील जमिनीचे बेकायदेशीररित्या प्लॉटींग पाडुन शासनाची फसवणूक केल्याने हे बेकायदेशीर कृत्य करणारे आबाराव रामचंद्र कोमटवार (तेलंग), सुरेश रामचंद्र कोमटवार (तेलंग), संजय रामचंद्र कोमटवार (तेलंग) सर्व रा. धारुर, ता. धारुर, जि. बीड यांच्यावर योग्य ती कडक शिक्षेस व दंडास पात्र स्वरुपाची कायदेशीर कार्यवाही करावी अशी मागणी पुन्हा एकदा सामाजिक कार्यकर्ते आसीम जरगर आणि जमील कुरेशी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात दिलेल्या निवेदनातून केली आहे.



मौजे धारुर, ता. धारुर, जि. बीड येथील सर्वे नं. ६२२, ६२३अ,आ नामे नुरबाग मधील शेतजमिनी चे मौजे धारुर ता. धारुर जि. बीड येथील गुंड प्रवत्तीचे व राजकीय पाठबळ असलेले पैश्याच्या व मनगटाच्या जोरावर दबाव टाकणारे आबाराव रामचंद्र कोमटवार (तेलंग), सुरेश रामचंद्र कोमटवार (तेलंग), संजय रामचंद्र कोमटवार (तेलंग) सर्व रा. धारुर ता. धारुर जि. बीड ह्या लोकांनी वर नमुद सर्वे नं. ६२२, ६२३अ, ६२३आ मधील शेत जमिनीची प्लॉटींग पाडून व सदरचे प्लॉटींग बाबत खोटे, चुकीचे व बोगस एन ए ले आऊट तयार करुन सदर सर्वे नं. ६२२, ६२३अ, ६२३आ मधील जमिन बेकायदेशीररित्या विक्री केलेले आहे. सदर सर्वे नं. ६२२, ६२३अ, ६२३आ, मधील प्लॉटींग बाबत अर्जदार यांनी दि. ३०/१०/२०२४ रोजी सहायक संचालक नगर रचनाकार शाखा बीड यांना रितसर तक्रारी अर्ज दिला असुन संबंधीत अधिकारी यांनी अर्जदार यांना दि. २६/११/२०२४ त्यांचे कार्यालयामार्फत सही शिक्यानिशी पत्र दिले आहे. सदर पत्रात स्पष्टपणे नमुद केलेले आहे की, त्यांच्या कार्यालयामार्फत वर नमुद इसमांना किंवा संबंधीतांना कोणत्याही/कसल्याही प्रकारचे सदर सर्वे नं. ६२२, ६२३अ, ६२३आ, मध्ये एन ए ले आउट साठी कायदेशीर परवानगी अथवा रेखांकनास अंतिम मंजुरीची शिफारस या कार्यालयाव्दारे करण्यात आलेली नाही. तसेच उर्वरित सर्वे नं. ६२२, ६२३अ, ६२३आ दि. १४/१०/१९९३ रोजीचे रेखांकनाची शिफारस केलेली या कार्यालयाच्या अभिलेखानुसार दिसून येत नाही. असे लेखी पत्र सदर कार्यालयाने अर्जदारास दिलेले आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, वर नमुद सर्व गुंड प्रवत्तीच्या व राजकीय पाठबळ असलेल्या तिन्ही इसमांनी बेकायदेशीर कृत्य करून सदर सर्वे नं. ६२२, व ६२३अ,आ मधील जमीनीची प्लॉटींग पाडून सदर प्लॉटिंगचे खोटे व चुक आणि बोगस एन ए ले आऊट काढुन बेकायदेशीररित्या कृत्य करुन शासनाची फसवणूक केलेली आहे. म्हणून याप्रकरणी वर नमुद केलेल्या गुंड प्रवत्तीचे व राजकीय पाठबळ असलेले तसेच, पैश्याच्या व मनगटाच्या जोरावर दबाव टाकरणारे आबाराव रामचंद्र कोमटवार (तेलंग), सुरेश रामचंद्र कोमटवार (तेलंग), संजय रामचंद्र कोमटवार (तेलंग) सर्व रा. धारूर, ता. धारुर, जि. बीड यांच्यावर योग्य ती कडक शिक्षेस व दंडास पात्र स्वरुपाची कायदेशीर कार्यवाही करावी. अशी मागणी जिल्हाधिकारी कार्यालयात दिलेल्या निवेदनातून सामाजिक कार्यकर्ते आसीम जरगर आणि जमिल कुरेशी यांनी केली आहे.

---

## सय्यद इरफान यांचा शेकडो कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी शरद पवार पक्षात प्रवेश

# आ.संदीप क्षीरसागरांना पुन्हा निवडून आणण्याची केली घोषणा

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील शहिंशहा नगर भागात राहणारे सय्यद इरफान यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह आमदार संदीप क्षीरसागर यांना पाठिंबा देत राष्ट्रवादी शरद पवार पक्षात जाहीर प्रवेश केला. तसेच आमदार संदीप क्षीरसागर यांना यावेळी सुद्धा मोठ्या मताधिक्क्याने पुन्हा बीड विधानसभा मतदारसंघातून निवडून आणू असे म्हटले. यावेळी माजी आमदार तथा मेफ्कोचे माजी अध्यक्ष सय्यद सलीम यांच्यासह राष्ट्रवादी पक्षाचे अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

यावेळी बोलताना सय्यद इरफान म्हणाले की, आमदार संदीप क्षीरसागर हे अगदी छोट्यात छोट्या, तळागाळातील तरुणांना एखाद्या मित्रासारखे, भावासारखे भेटतात,



आस्थेने विचारपूस करतात. मोठ्यांचा आदर सन्मान करतात. आमदार झाल्यापासून त्यांनी बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात कोणताही भेदभाव न करता स्वपक्षीयांसह विरोधकांची ही कामे केली आहेत. यामुळे या निवडणुकीत त्यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी शरद पवार पक्षात आम्ही सर्वांनी प्रवेश केला आहे. या निवडणुकीत संदीप भैय्यांच्या खांद्याला खांदा लावून प्रचाराच्या उरलेल्या दिवसात जोरात प्रचार करणार असून जास्तीत जास्त मतदान संदीप भैय्यांना मिळावे आणि ते मोठ्या मतांनी विजयी व्हावे. यासाठी तन-मन-धनाने काम करणार आहोत असे म्हटले. यावेळी सय्यद तौफिक, शेख माजेद, मुसेब बागवान, रिजवान बागवान, हामेद चाऊस, शेख रईस, सचिन गायकवाड, रेहान बागवान, शेख साहिल, रमेश राऊत, मुबीन पठाण, सोहेल पठाण, इमरान पटेल, शाकीर खान, शेख सोफियान, शेख नौशाद, पठाण आरिफ, शेख फैजान, शेख सोफियान, राजू मोमीन, आफताब शेख, सज्जाद शेख, साहिल पठाण, शेख समीर, एजाज शेख, मेहराज शेख, अल्ताफ भाई, सय्यद अक्रम, मोनू पठाण यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी आमदार संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली आणि माजी आमदार सलीम यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी शरद पवार पक्षात प्रवेश केला. यामुळे आमदार संदीप क्षीरसागर यांची बाजू या निवडणुकीत अजून भक्कम झाली आहे.

---

## राज्यभरात आज तिरंगा रॅली

मुंबई : राज्यातील महायुती सरकारकडून विविध जिल्ह्यात ऑपरेशन सिंदूरच्या समर्थनार्थ रविवार दि. ११ मे रोजी पायी यात्रेचे आणि तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीत सैन्य दलाच्या समर्थनार्थ आणि भारतीय जवानांचे मनोबल वाढविण्यासाठी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला. त्यानंतर, भारतीय सैन्य दल आणि भारत सरकारच्या समर्थनार्थ अनेक जिल्ह्यात ही रॅली निघणार आहे.

---

# मौलाना आझाद युवा मंचचे मराठवाडा अध्यक्षपद अरफात खान यांना द्या-सलमान

**बीड । प्रतिनिधी**

**मौलाना आझाद युवा मंच चे बीड जिल्हाध्यक्ष अरफात खान यांना मराठवाडा अध्यक्ष पद द्यावे अशी मागणी मंचाचे बीड शहराध्यक्ष सय्यद सलमान यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केली आहे.**



अरफात खान यांना मौलाना आझाद युवा मंचचे संस्थापक अध्यक्ष शेख खलील अहेमद यांनी बीड जिल्हाध्यक्ष पद दिल्यापासून अरफात खान यांनी आपल्या उत्कृष्ट कार्याच्या धडाक्याने मंचाला एका विशिष्ट उंचीवर नेले आहे. दिवसेंदिवस मंचाचे संघटन मजबूत करत आहेत. जिल्हाध्यक्ष या नात्याने त्यांनी आतापर्यंत अनेक तरुणांना विविध पदे देऊन संघटनेचा आवाका वाढविला आहे. नियुक्त केलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांसोबत मिळून शेकडो कार्यकर्त्यांना त्यांनी मंचासोबत जोडले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन मौलाना आझाद युवा मंचचे संस्थापक अध्यक्ष शेख खलील अहेमद यांनी मंचाचे रिक्त असलेले मराठवाडा अध्यक्षपद अरफात खान यांना द्यावे. कारण जिल्हा पातळीवर जिल्हाध्यक्ष म्हणून काम करत असताना ते मंचासाठी करत असलेले उल्लेखनीय कार्य पाहता त्यांना त्यांच्या कार्याची पावती म्हणून मराठवाडा विभागाचे अध्यक्षपद देऊन त्यांना मराठवाडा विभागीय पातळीवर काम करण्याची संधी द्यावी. जेणेकरून ते संपूर्ण मराठवाडा भर मंचाचे संघटन दिवसेंदिवस वाढवून चांगले मजबूत करतील आणि मंचाच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे प्रश्न उचलून मार्गी लावण्याचा प्रयत्न करतील असेही मंचाचे शहराध्यक्ष सय्यद सलमान यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकातून म्हटले आहे.

---

## पान १ वरून...

### पीकविमा भरपाईचे ३७२०

स्थानिक नैसर्गिक आपत्ती, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या दोन ट्रीगरमधून मंजूर भरपाईच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करत आहेत. या दोन ट्रीगरमधून मंजूर भरपाई ३ हजार ४३३ कोटी रुपये आहे. त्यापैकी ९ एप्रिलपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात ३ हजार १२६ कोटी रुपये जमा करण्यात आले. तर ३०७ कोटी रुपये जमा करण्याचे काम सुरु आहे.

-----------

### अखेर भारत-पाकिस्तानमध्ये

करण्यास सहमती दर्शविली आहे हे जाहीर करताना मला आनंद होत आहे. "शांततेचा मार्ग निवडण्यात पंतप्रधान मोदी आणि शरीफ यांच्या शहाणपणा, विवेक आणि राजकारणाबद्दल आम्ही त्यांचे कौतुक करतो." दरम्यान, भारत आणि पाकिस्तानमधील गोळीबार आणि लष्करी कारवाई थांबवण्याचे काम दोन्ही देशांमध्ये थेट झाले असल्याचे भारतीय सरकारी सुत्रांनी सांगितले. दुपारी पाक डीजीएमओने कॉल केला त्यानंतर चर्चा झाली आणि समझोता झाला. इतर कोणत्याही मुद्द्यावर इतर कोणत्याही ठिकाणी चर्चा करण्याचा कोणताही निर्णय झालेला नाही, असे सुत्रांनी म्हटले आहे. पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री इशाक दार म्हणाले, पाकिस्तान आणि भारत यांनी तात्काळ प्रभावीपणे युद्धबंदीवर सहमती दर्शविली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय सैन्याने ६ मे च्या मध्यरात्रीपासून ऑपरेशन सिंदूर राबवले. यामध्ये पाकिस्तानातील ९ दहशतवादी तळ पूर्णपणे उद्ध्वस्त केले आणि या कारवाईत १०० पेक्षा अधिक दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला. त्यानंतर पाकिस्तानकडून सीमेवरील ठिकाणांवर हल्ल्याचा प्रयत्न झाला, त्याला भारताकडून चोख प्रत्युत्तर दिले जात आहे. यामुळे तणाव वाढला होता.

-----------

### इंदिरा गांधी होना

माजी पंतप्रधान इंदिरा गांधींच्या १९७१ च्या आठवणी जागवल्या जात आहेत. इंदिरा होना आसान नही...! असे म्हणत काँग्रेसकडून इंदिरा गांधीचे जुने व्हिडिओ व फोटो शेअर केले जात आहेत.

इंदिरा गांधी पंतप्रधान असताना १९७१ साली पाकिस्तानचे दोन तुकडे झाले आणि बांग्लादेशची निर्मिती झाली होती. या ऐतिहासिक घटनेच्या शिल्पकार म्हणून इंदिरा गांधींना ओळखले जाते. दरम्यान, केंद्रातील मोदी सरकारच्या नेतृत्वात गेल्या ३ दिवसांपासून सुरू असलेल्या भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीला अखेर विराम मिळाला आहे. पाकिस्तानच्या संरक्षण मंत्रालयाकडून आलेल्या फोन कॉलनंतर भारताने याबाबतची घोषणा केली. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सैन्य दलाच्या कारवाई थांबल्याची घोषणा होताच, काँग्रेसकडून दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधींच्या आठवणींना उजाळा दिला जात आहे. इंदिरा गांधींनी १९७१ च्या युद्धावेळी घेतलेल्या कणखर भूमिकेची आठवण करुन दिली जात आहे. काँग्रेस प्रवक्त्या सुप्रिया सिनेट यांनी ट्विट करत इंदिरा होना आसान नही, असे म्हटले. तर, इंदिरा गांधींच्या जुन्या व्हिडिओ आणि फोटोंसह १९७१ च्या युद्धावेळच्या आठवणी शेअर केल्या जात आहेत. त्यामुळे, एक्स सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर इंदिरा गांधी हा हॅशटॅग ट्रेंड होत आहे. १९७१ साली एक संधी चालून आली आणि त्याचा फायदा घेऊन इंदिरा गांधींनी पाकिस्तानला धडा शिकवण्याचा निर्धार केला होता. २५ एप्रिल १९७१ साली तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी एका बैठकीत भारताच्या लष्करप्रमुखांना आदेश दिला की, पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी जर युध्द करावे लागले तरी ते करावे. पुढच्या परिणामांची काळजी करु नये. इंदिरा गांधींना हा असा आदेश द्यावा लागला होता कारण भारताच्या पूर्व भागातील पाकिस्तानमध्ये, म्हणजे आताच्या बांग्लादेशमध्ये अशा काही घडामोडी घडत होत्या की त्याचा थेट परिणाम भारतावर होत होता.

-----------

### मान्सून २७ मे रोजी

आधी मान्सून येणार आहे. मान्सूनची केरळमध्ये आगमनाची वेळ ६ परिमानांवरून ठरविली जाते. त्यात वायव्य भारतातील किमान तापमान, दक्षिण द्वीपकल्पावर पूर्व मोसमी पावसाचे वाढलेले प्रमाण, प्रशांत महासागरातील वायव्य भागातील समुद्रसपाटीवरील हवेचे दाब, दक्षिण चीन समुद्रातून बाहेर पडणारे किरणोत्सर्ग, ईशान्य हिंद महासागरातील हवेच्या खालच्या थरातील वाऱ्याचे प्रवाह आणि इंडोनेशियातील हवेच्या वरच्या थरातील वाऱ्याचे प्रवाह, हे परिमाण वापरले जाते. देशात यंदा चांगल्या पावसाचा अंदाजही देण्यात आला. यंदा मान्सून हंगामात, जून ते सप्टेंबर या कालावधीत १०५ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने जाहीर केला. या अंदाजात पाच टक्के कमी-अधिक पाऊस पडण्याची शक्यताही गृहीत धरण्यात आली आहे. राज्यात सर्वदूर चांगल्या पावसाचे संकेत असून, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण अधिक राहण्याची शक्यताही वर्तविण्यात आली आहे.

---------

### आमदारांशी चर्चा करूनच सुप्रियाताई

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रमासाठी ते आज साताऱ्यात आले होते. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यास आश्चर्य वाटायला नको, या शरद पवार यांच्या वक्तव्याबाबत रोहित पवार म्हणाले, 'कार्यकर्त्यांची कामे झाली पाहिजेत. ही कामे करण्यासाठी सत्तेत गेले पाहिजे, अशी चर्चा आमदारांकडून झाली असावी. त्यातूनच शरद पवार यांनी मुलाखतीत असे बोलले असावेत. शरद पवार ज्यावेळी यासंदर्भाने बैठक बोलावतील, त्या वेळी त्यांच्यापुढे मत मांडेन. राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या प्रक्रियेत मी नाही.

------------

### यूपीएससीची २५ मे रोजी होणारी परीक्षा

असलेल्या व्यक्ती/दिव्यांगत्व व्यक्ती श्रेणीतील उमेदवारांसाठी एक महत्त्वाची अधिसूचना जारी केली आहे, ज्यांनी आगामी प्रिलिम्स परीक्षेसाठी स्क्राइबची सुविधा घेण्याचा पर्याय निवडला आहे. यूपीएससीने जारी केलेल्या नोटिशीनुसार, ज्या उमेदवारांनी स्क्राइबचा पर्याय निवडला आहे ते प्रिलिम्ससाठी त्यांचे स्क्राइब बदलू शकतात. त्यासाठी त्यांनी १८ मे २०२५ रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत त्यांचा विनंती अर्ज सादर करायचा आहे.

---------

### गेवराईच्या आगारात पाच

मिळणार आहेत. या प्रसंगी आ. विजयसिंह पंडित यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार, आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे आभार व्यक्त केले. दरम्यान आमदारासाठी राखीव असलेल्या आसनावर बसून आमदार यांनी काही किलोमीटर प्रवास केला.

--------------

### देशभक्तांनी मोठ्या संख्येने

पाकिस्तानात घुसून आपल्या भारतीय भुदल,नौदल आणि हवाईदलाचे अधिकारी आणि जवानांनी दाखविलेल्या साहसाला आणि धैर्याला सलाम करून खरोखरच देशप्रेमाची भावना जागी करण्यात आली. यामुळे बीडमध्ये रविवारी दि. ११ मे रोजी सकाळी १० वाजता तिरंगा रॅली काढून भारतीय जवानांचे मनोबल वाढविण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून दुचाकी रॅलीला सुरुवात होणार आहे. माळीवेस, सुभाष रोड, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ रॅलीचा समारोप करण्यात येणार आहे. यामध्ये देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शेख निजाम, शेख अमर, कय्युम इनामदार, सय्यद फईम, जयंत वाघ, सत्तार इनामदार, सय्यद आझम, शेख जाकीर, शेख नसीर यांनी केले आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि. ११ मे २०२५





बीड : क्षत्रिय राजपूत महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरातील यशवंत उद्यानात असणाऱ्या महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यास अभिवादन करताना शिवसेनेचे जिल्हा सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे, जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, जयसिंग मामा चुंगडे, सुरेश तात्या शेटे, सुशील पिंगळे, संजय महाद्वार, रतन तात्या गुजर, राणा चव्हाण, विक्रांतसिह हजारें,सतीशसिंह परदेशीं, सुरज चुंगडे, पंकज बाहेगाव्हाणकर सह आदी.

# डॉ.योगेश क्षीरसागर दररोज जनतेत

## दिखावा कमी, काम जास्त; सामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यावर दिला भर

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर हे दरदिवशी जनतेत रमलेले आहे. विधानसभेच्या निवडणुकीत अपयश आल्यानंतर काही काळ ते शांत होते, मात्र आता ते दररोज जनतेत मिसळताना आणि त्यांच्या अडचणी समजून घेत त्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचं दिसून येत आहे.

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सध्या ''दिखावा कमी, काम जास्त'' या भूमिकेला प्राधान्य दिलं आहे. कोणताही गाजावाजा न करता ते मतदारसंघात जात आहेत. स्थानिक प्रश्न, नागरिकांच्या अडचणी, अपूर्ण विकासकामे, गरजूंना मदतीचा हात, या सगळ्यांवर त्यांचा भर आहे. दररोज जनसंपर्क करून लोकांच्या समस्या ऐकून घेणे आणि त्या संबंधित यंत्रणेकडे पाठवून सोडवणुकीसाठी पाठपुरावा करणे, हा त्यांचा दिनक्रम बनला आहे. निवडणुकीच्या राजकारणापलीकडे जाऊन सामाजिक बांधिलकी





जपत त्यांचा प्रत्यक्ष जनसंपर्क सुरु आहे. डॉ.क्षीरसागर हे केवळ राजकीय दौरेच नव्हे तर सामाजिक आणि व्यक्तिगत सुख-दुःखाच्या प्रसंगीही उपस्थित राहतात. गावातील कोणताही आनंदाचा प्रसंग असो वा दुःखद घटना, त्यांनी हजेरी लावलेली आढळते. विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. मात्र, विरोधक दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत असल्याचा दावा, त्यांच्या समर्थकांमधून केला आहे.

### पाणी प्रश्नाबाबत प्रशासनाकडे पाठपुरावा; अजित पवारांच्या कॉलनंतर यंत्रणा हालली

बीड शहराचा पाणी प्रश्न सध्या ज्वलंत विषय बनला आहे. या विषयावर डॉ.योगेश क्षीरसागर यांनी त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सत्तेत असल्याने रस्त्यावर उतरून लढाई करण्याऐवजी प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा करून हा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्यांच्या प्रयत्नांना काही प्रमाणात यश देखील येत आहे. बीडच्या पाणी प्रश्नावर थेट पालकमंत्री अजित पवार यांच्याशी बोलून जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश द्यायला लावले आहेत. त्यानंतर पाणी प्रश्न सोडविण्यासाठी नगरपरिषद प्रशासन वेगाने हालचाली करत असल्याचे दिसून आले आहे.

### सर्वसामान्यांचे प्रश्न थेट अजितदादांसमोर

डॉ.योगेश क्षीरसागर हे केवळ जनतेच्या अडचणी ऐकून घेत नाहीत, तर त्या प्रशासकीय पातळीवर मार्गी लावण्यासाठी सातत्याने प्रयत्न करतात. विविध विभागांशी बैठक, अधिकाऱ्यांशी संवाद अशा माध्यमांतून ते पाठपुरावा करत असतात. विशेष म्हणजे, अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर त्यांनी थेट राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून आवश्यक त्या निर्णयांसाठी पाठपुरावा केला आहे.

# गांजा ओढणारा पोलीस बडतर्फ पण विकणारे मोकाट

बीड । प्रतिनिधी

येथील पोलीस अधिक्षक यांच्या निवासस्थानातच चक्क गांजा ओढणाऱ्या बाळू बहिरवाळ या पोलीस कर्मचाऱ्याला स्वतः नवनीत कॉवत यांनी रंगेहात पकडल्यानंतर त्या कर्मचाऱ्यावर शिवाजी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.त्यानंतर त्याच्यावर बडतर्फीची कारवाई देखील करण्याचे धाडस एसपींनी दाखविले.पण एकीकडे हे सर्व घडले असताना दुसरीकडे या कर्मचाऱ्याकडे गांजा कोठून आला? याचा शोध अद्याप लागलेला नाही.विशेष म्हणजे मागच्या काही वर्षांपासून पेठ बीडमध्ये गांज्याची विक्री सर्रासपणे अजूनही भरदिवसाच सुरु आहे.आता तर या धंद्यात महिलांच्या टोळ्या गांजा विक्रीसाठी सक्रिय झाल्या असल्याने स्थानिक पोलिसांच्या आशीर्वादावर हा धंदा तेजीत आल्याचे चर्चिले जाते.

पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे बंद तर सोडा पण त्यावर फार अंकुश ही नाही असे चित्र आहे.मोबाईल चोरांची टोळी,मटका,गुटखा यासोबतच गांज्याची देखील मोठ्या प्रमाणावर विक्री या भागात होते.शहरात व्यसनाधीन असलेल्या लोकांना गांजा हवा असेल तर थेट गांधी नगर भागात ते जातात आणि तिथे महिला रस्त्यावर उभा राहून किंवा बसून भरदिवसा गांजा विक्री करतात.अवघे १०० रुपये दिले की एक गांज्याची पुढी त्या महिलेकडून आरामात पिशवीतून काढून दिली जाते.दिवसाला साधारण एक महिला ५ हजारांच्या घरात गांज्याची विक्री करते अशी प्राथमिक माहिती देखील आहे.त्या भागात साधारण गांजा विक्री करणाऱ्या ५ ते ६ महिला सक्रिय असून भरदिवसा आणि तेही रस्त्यावर भरणाऱ्या या बाजाराकडे पोलिसांना साधे लक्ष्य ही नाही हे आश्चर्यकारक आहे. पोलीस अधिक्षकांच्या निवासस्थानात पोलीस कर्मचारी गांजा ओढताना सापडल्यानंतर बीडमध्ये गांज्याच्या विक्रीवर प्रचंड निर्बंध येतील आणि काही दिवसांसाठी का होईना गांजा हद्दपार होईल असे अपेक्षित होते.इथे मात्र रस्त्यावरच तेही महिला न भिता गांज्याची विक्री करत आहेत. दरम्यान पोलीस अधिक्षक यांनी कर्मचाऱ्यावर दाखविले धाडस आता गांज्याला अभय देणाऱ्यांवर पण दाखविणार का ? हा प्रश्न यानिमित्ताने निर्माण होतोय.

# संत बंकट स्वामी महाराज पुण्यतिथी उत्सवात विधायक उपक्रम; संस्थानने केले गरजू मुलींचे कन्यादान

नेकनूर । प्रतिनिधी

वारकरी संप्रदायाचे श्रीगुरु बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात विधायक उपक्रम राबवत. आज संस्थानच्या वतीने कन्यादान करण्यात आले.नेकनूर येथील भीमराव गणगे यांची भाची रेणुका राऊत या गरजू मुलींचे कन्यादान करत त्यामध्ये लग्नाचा खर्च उचलून समाज उपयोगी साहित्य देऊन कन्यादान केले आहे. हा विवाह सोहळा आणखीनही १३ मे पर्यंत सुरू राहणार असून परिसरातील इच्छुक वर वधू पित्यांनी याचा लाभ घेऊन आपल्या मुला मुलींचे विवाह सप्ताहात करण्याचे आवाहन ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे विश्वस्त



व अन्नदान कमिटी, ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील महान संत वै बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सव सुरू आहे . यात महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकारची कीर्तने, प्रवचने, संगीत भजन, आणि संत कथा सुरू आहे या याशिवाय बंकटस्वामी संस्थान ८१ व्या पुण्यतिथीनिमित्त सप्ताहात मुलींचे कन्यादान करून संसार उपयोगी साहित्य देण्याचे जाहीर केल्यानंतर नेकनूर येथीलच भीमराव गनगे यांची भाची हिचा विवाह अजय घोडके बोरखेड यांच्याशी लावून संस्थाने कन्यादान करत संसार उपयोगी साहित्य देत स्तुत्य उपक्रम राबवला आहे आणखीनही १३ मे पर्यंत संस्थान गरजू मुलींचे कन्यादान करणार असल्याने परिसरातील इच्छुक वर वधू पित्यांनी लाभ घेण्याचे आवाहन संस्थांचे महंत लक्ष्मण महाराज मेंगडे व विश्वस्त , अन्नदान समिती , व नेकनूरक रांच्यावतीने करण्यात आले आहे.

# नावाप्रमाणेच सगळं बीड पण अंध:कारमाय परिस्थितीत- सोनल पाटील

## आहे का कोणी वाली बीडला? कुणी पण या अन् टिकली मारून जा

**बीड । प्रतिनिधी**

**शहराला पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईन मध्ये सडलेली कुत्री आढळून आलीत, ही बातमी अफ़वा आहे अस मत नगरपालिका प्रशासनाने मांडले आहे, मग सकाळ पेपर ला आलेली न्युज आणी फोटो जल शुद्धीकरन केंद्रावर मोकाट कुत्र्यांचा वावर होतोय, असे निदर्सनास आले, मग ती पण अफ़वा आहे का, ईदगाह भागातील केंद्रावरिल प्रकार ही बातमी नुसती बातमी नसून बीड करांच्या जीवाशी खेळण्याचा विषय आहे या बाबतीत गांभीर्याने विचार झाला पाहिजे,**

मुख्य अधिकाऱ्यांना जवाब विचारणार कोणी नाहीच ना, त्या मुळे पिण्याच्या पाईप लाईन मध्ये आज सडलेले कुत्रे निघतात उद्या डुक्कर पण निघतील, बीड च्या सर्व पदाधिकारांनी सरळ राजीनामा द्यावा कशाला नगरपालिकेचे अधिकारी म्हणून मिरवतात तुम्हाला जर बीड करांशी त्यांच्या जीवाशी काही घेणं देण नाही तर? बीड मध्ये विज नाही, पाणी नाही, कचऱ्याचा प्रश्न मार्गी नाही स्वछता नाही, सर्वांत घाण माझे शहर म्हणायची वेळ आली आहे प्रत्येक पदाधिकारीही सतेच्या नावाखालि स्वतःला मोठे करताय् आणी बीड च्या जनतेच्या जीवाशी खेळताय धिक्कार असो अश्या पद घेऊन बसलेल्या अधिकाऱ्यांचा, लोकांचा जीव गेला तरी चालेल पण आपले पगार बंद नाही झाले पाहिजे सर्व साधारण जनतेचे नगरपालिका अधिकाऱ्यांनी फोन नाही उचलायचे, नगर पालिकेत गेले असता मुख्य अधिकाऱ्यांच्या खुर्च्या रिकाम्याच असतात, मग आम्ही जायचे कुठे? २१ एप्रिल पासून शहराला पाणी पुरवठा नाही, ज्यांच्या कडे पैसे आहेत ते लोक टँकर मागवतात, विकत पाणी घेताय, पण गरीब जनतेने काय करायचे, कुठे जायचे, ज्यांना एकवेळचे जेवण नाही त्यांनी रोज कसे पाणी विकत घ्यायचे निदान त्यांना तरी काही पर्यायी व्यवस्था नगरपालिका प्रशासनाने द्यावी, कळकळीची विनंती आहे, कचऱ्या मुळे शहरात रोगराई पसरते आहे, शहरातील काही मुख्य ठिकाणी जिथं घर,




लहान मुलांचा, इतर लोकांचा सतत वावर आहे अशा ठिकाणी रस्त्याच्या दुथडी कचरा ओसंडत आहे, घाणच घाण, दुर्गंधी पसरलेली आहे, का या सर्व गोष्टींची गांभीर्याने दखल घेतली जात नाही, नळपट्टी, घरपट्टी, लाइटबील सर्व काही अगदी न विसरता नागरिकांकडून वसुल केले जाते, मग त्या बदल्यात आम्हाला काय मिळते? बीड ची जनता निर्जीव आहे का म्हणून इतका अत्याचार सुरु आहे, बीड च्या प्रत्येकाने आपापल्या भागातील प्रश्न प्रशासनाकडे पोहचवा नहिं तर लवकरच एक मोठ आंदोलन करूया जेणेकरून काहीतरी मार्ग निघेल. अशी कळकळीची विनंती तेजस्विनी ग्रूप संस्थापिका सोनल पाटील यांनी प्रसिध्दी पत्रकाच्या माध्यमातून केली आहे.

# राष्ट्रीय खेलो इंडिया युथ गेममध्ये महाराष्ट्र संघास ब्राँझ मेडल प्राप्त; बीडच्या वेदांतने केली संघासाठी चमकदार कामगिरी

बीड । प्रतिनिधी

भारत सरकार क्रीडा व युवक कल्याण विभाग अंतर्गत राष्ट्रीय पातळीवर प्रतिवर्षी होत असलेल्या खेलो इंडिया युथ गेम साठी बीड जिल्हा रग्बी असोसिएशनच्या ५ खेळाडूंची राज्यसंघात निवड झाली होती.खेलो इंडिया युथ गेम राष्ट्रीय स्पर्धेत रग्बी खेळाचा समावेश यावर्षी झाला आहे. ही स्पर्धा दिनांक ४ मे ते ९ में २०२५ रोजी पाटणा बिहार येथे संपन्न झाली. महाराष्ट्र संघात बीड जिल्ह्या रग्बी असोसिएशनचे खेळाडू १)वेदांत गोरख डावकर २) आदिती सखाराम लोंढे ३)कीर्ती किरण जाधव ४)दिपाली दिलीप ताटे ५)समीक्षा अरुण ताटे या ५ खेळाडूची निवड झाली होती. या सर्व खेळाडूंनी मैदानावरचे सातत्य, नियमित व्यायाम/ सराव, कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटी या जोरावर आपले स्थान महाराष्ट्र संघात निश्चित केले आहे. महाराष्ट्र मुले संघाने या स्पर्धेत ब्राँझ मेडल ( तृतीय क्रमांक) प्राप्त केले. या संघात




बीडच्या वेदांत गोरख डावकर याने संघाला विजय मिळवून देण्यात मोलाचे योगदान दिले.खेलो इंडिया युथ गेम्स या स्पर्धेत तृतीया येणाऱ्या संघातील प्रति खेळाडू ५० हजार रु शासनाकडून शिष्यवृत्ती मिळणार आहे.तसेच मुली संघाला ब्राँझ मेडल सामन्यात अटीतटीच्या लढतीत पराभव पत्करावा लागला. मुली संघाचा चतुर्थ स्थानावर समाधान मानावे लागले.

हे सर्व खेळाडू रोज सायंकाळी ६ ते ८.३० पर्यंत मोरया क्रीडा मंडळ, तुळजाई चौक,कॅनॉल रोड, नाट्यगृह जवळ मंडळाच्या मैदानावर वर्षभर सराव करतात. मोरया क्रीडा मंडळ बीडचे संस्थापक अध्यक्ष, राष्ट्रीय रग्बी प्रशिक्षक, बीड जिल्हा रग्बी मुख्य प्रशिक्षक श्री नितीन येळवे कारागृह पोलीस व रग्बी प्रशिक्षक शोएब खाटीक आणि अशोक चौरे (सचिव,मोरया क्रीडा मंडळ) यांनी खेळाडूची निवड महाराष्ट्र संघात होण्याकरिता सर्व खेळाडूंचा कसून सराव करून घेत आहेत.

महाराष्ट्रतील खेळाडूंच्या या कामगिरी बद्दल रग्बी असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे सचिव नासेर सर, सहसचिव संदीप मोसमकर, मीनल पास्ताला, ईश्वर कोटारकी, प्रशिक्षक म्हणून प्रणव पाटील आणि उज्वला घुगे आणि बीड जिल्हा रग्बी फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष इसाक शेख ,सचिव श्री महेश घुले, उपाध्यक्ष रमेश सानप, कोषाध्यक्ष श्री हरिभाऊ बांगर ,कार्याध्यक्ष नितीन येळवे, कारागृह पोलीस तसेच प्रशिक्षक शोएब खाटीक ,प्रशिक्षक अशोक चौरे,श्री साईनाथ राजे, भगवानराव बागलाने, यश जाधव (आंतरराष्ट्रीय खेळाडू), शिवराज देवगुडे, सतीश तकिक, अदनान शेख,राष्ट्रीय रग्बी खेळाडू सूरज येडे, ईश्वर कानडे,ओंकार मोरे, आकाश खांडे, संदीप वडमारे , राज्य खेळाडू तसेच राष्ट्रीय पंच संभाजी गिरे,विशाल ढास इतर सर्व पदाधिकारी आणि समस्त मोरया क्रीडा मंडळ परिवार बीड आदींनी अभिनंदन केले आहे.

# रेतीची अवैधरित्या चोरटी वाहतूक करणाऱ्या वाहनाविरुध्द माजलगाव शहर पोलीसांची कारवाई

**माजलगाव । प्रतिनिधी**

**येथील शहर पोलीसांनी गोपनिय माहीतीच्या आधारे शहरातील समता कॉलनी येथील आनंद बालरुग्नालय समोर समोर दि ०९ मे शुक्रवार रोजी ०२:०० वाजण्याच्या दरम्यान एक अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक करत असलेला पासिंग क्रमांक नसलेला ४०७ टेम्पो रेतीसह पकडुन टेम्पो किंमती ,दोन लाख रुपये व दोन ब्रास रेतीची किंमत १०,०००/ रुपये असा एकुण दोन लाख दहा हाजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड,श्रीमती चेतना



तिडके,अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, अनिल चोरमले, उपविभागीय पोलीस अधिकारी अंबाजोगाई, अति. पदभार माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोहेकॉ नंदकिशोर परळकर, रामेश्वर खेत्रे, चालक,पोलीस अंमलदार सहाधु कोकाटे यांनी केली आहे.

# वीजग्राहक आपले दैवत; त्यांना सर्वोत्कृष्ट सेवा द्या-संचालक धनंजय औंढेकर

**जालना । प्रतिनिधी**

**वीजग्राहक आपले दैवत आहेत. त्यांना अखंडित वीजपुरवठ्यासह सर्वोत्कृष्ट सेवा द्या. तसेच वीजबिलांच्या १०० टक्के वसुलीसह वीजचोरी रोखण्याकडेही कटाक्षाने लक्ष द्या, असे आवाहन महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे प्रभारी सहव्यवस्थापकीय संचालक धनंजय औंढेकर यांनी केले.**

जालन्यातील मातोश्री लॉन्स येथे शनिवारी (१० मे) जिल्ह्यातील जनमित्र, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा संवाद मेळावा पार पडला. यावेळी औंढेकर बोलत होते. या कार्यक्रमास अधीक्षक अभियंता संजय सरग, प्रभारी उपमहाव्यवस्थापक चंद्रकांत खाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना औंढेकर म्हणाले की, जनमित्र (लाईनमन) हा महावितरणचा चेहरा आहे. सर्व जनमित्रांनी नेहमी गणवेशात रहावे. त्यामुळे जनमानसात सकारात्मक



संदेश जातो. कर्मचाऱ्यांना आवश्यक सुरक्षा साधने दिली जातील. कर्मचाऱ्यांनी विद्युत यंत्रणेवर काम करताना त्याचा कटाक्षाने वापर करावा. जालना जिल्ह्यात उच्चदाब ग्राहकांकडून सर्वाधिक महसूल जमा होतो हे भूषणावह आहे. जिल्ह्यातील ग्राहकांना दैवत मानून त्यांची इमानेइतबारे सेवा करा. ग्राहकांना सुरळीत वीज व सर्वोत्तम सेवा दिली तर वीजबिल वसुली करणेही सोपे जाते. यावेळी मार्च महिन्यात केलेल्या वीजबील वसुलीचे कौतुक करत, गावांची थकबाकी शून्य केलेल्या तीन जनमित्रांचा औंढेकर यांनी सत्कार केला. वीजबिल वसुलीवरच महावितरणचा डोलारा उभा आहे. त्यामुळे प्रत्येक महिना हा मार्च समजूनच प्रत्येकाने कार्यरत रहायला हवे, अशा सूचना त्यांनी केल्या.

ग्राहकांच्या वीजबिल दुरुस्तीची प्रकरणे तातडीने निकाली काढाव. यासाठी जनमित्रांसह लेखा कर्मचाऱ्यांनीही पुढाकार घ्यावा, जेणेकरून ग्राहक आपले वीजबिल वेळेवर भरेल. अखंडित वीजपुरवठ्यासाठी मान्सूनपूर्व देखभाल-दुरस्तीची कामे १५ मेपर्यंत पूर्ण करावीत. फिडरवर कमीत कमी ट्रिपिंग व्हाव्यात, याकडे क्षेत्रीय अभियंते, कर्मचाऱ्यांनी लक्ष द्यावे. जिल्ह्यात वीजचोरीचे प्रमाण चिंताजनक आहे. यात बदल करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवेत. प्रत्येक उपविभागामध्ये वीजचोरी पकडण्यासाठी धडक मोहीम राबवा. प्रत्येक महिन्याला प्रत्येक उपविभागाने कमीत कमी १०० वीजचोऱ्या पकडल्या पाहिजेत, असे निर्देश औंढेकर यांनी दिले. सौर कृषिपंपांच्या जोडणीमध्ये जिल्ह्याने उत्कृष्ट काम केले आहे. सर्व कर्मचाऱ्यांना त्याचे श्रेय आहे. ही शासनाची महत्त्वाकांक्षी योजना असून नियमानुसार पात्र ग्राहकांना सौरपंप मिळाले पाहिजे. चुकीच्या पद्धतीने किंवा नियमबाह्यरीत्या सौरपंप लावण्यात येऊ नयेत. रूफ टॉप सोलर योजनेत मात्र जिल्ह्यात समाधानकारक काम झाले नाही. वीजगळती अधिक असणाऱ्या भागांत ही योजना राबवण्यासाठी विशेष प्रयत्न करा. १०० युनिटपेक्षा कमी वीजवापर असणाऱ्या ग्राहकांना प्रामुख्याने या योजनेत सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करावे, अशी सूचना औंढेकर यांनी केली. तब्बल तीन तास चाललेल्या या संवाद मेळाव्यामुळे महावितरणच्या कर्मचाऱ्यांत नवचैतन्य निर्माण झाले. सूत्रसंचालन व्यवस्थापक (मानव संसाधन) डॉ.शिवाजी तिकांडे यांनी केले. कार्यक्रमास जालना जिल्ह्यातील जनमित्र व यंत्रचालकांसह सर्व कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते, शाखा अभियंते तसेच मानव संसाधन व लेखा विभागाचे अधिकारी, कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

पान ६ वरून...

### गायक राज रायते यांचा

श्री संताजी नवयुवक मंडळ महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष मा. सुभाषजी घाटे यांनी दीले आहे. आपल्या कला गुणांनी परिपूर्ण असलेल्या राज चा समस्त तेली समाजाच्या वतीने भरपूर ठिकाणी मोठमोठ्या प्रमाणात सत्कार होत आहे. राज रायते यांना सर्व समाज बांधवां ची साथ असुन, त्यांची आई सौ.सोनाली रायते व वडील श्री. प्रल्हाद चंद्रकांत रायते यांचीही खंबीर साथ आहे. आता पर्यंतच्या मेहनती मध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. समाजातएक वेगळी ओळख निर्माण करून संपूर्ण तेली समाजात रायते कुटुंबाचे नावलौकीक केले आहे. राज यांचे पंजोबा, कै.संत आसारामजी वैजनाथराव रायते तसेच आजोबा कै. चंद्रकांता आसारामजी रायते यांची पुण्याई आहे. समाजाच्या वतीने शेगांव येथे होणाऱ्या भव्य राज्यस्तरीय सत्कार समारंभात बीड जिल्ह्यातील गायक राज प्रल्हाद रायते यांचा होणाऱ्या सन्मान सोहळ्यामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे राज ला फोन द्वारे, मेसेज द्वारे व सर्व सोशल मीडिया द्वारे शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.११ मे रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत हा कार्यक्रम अग्रेसन भवन , रेल्वे स्टेशन समोर, शेगांव, जिल्हा बुलढाणा येथे आहे.सर्व समाज बांधवांनी व मित्र परिवारांनी या सत्कार सोहळ्यात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे अशी विनंती करण्यात आली आहे.

### जोग महाराज वारकरी

श्री क्षेत्र नेकनूर पुण्यभूमी आहे.संतांची जन्म भूमी पुण्य भूमी आहे. या बंकटस्वामी महाराजांचा संस्थानच्या भौतिक आणि अध्यात्मिक विकासात लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे खूपकार्य खूप चांगले सुरु आहे.२०० हून अधिक गरीब गरजू मुले अध्यात्माचे धडे गिरवत आहेत एकूण समाधान वाटले.. देवगड संस्थानला भागवत कथेची सेवा करण्याचा योग आला. असे म्हणत संस्थानच्या कार्यास शुभेच्छा दिल्या. व आध्यात्मिक कार्याचा गौरव आणि कौतुक केले.

cmyk

# कधी जमा होणार किसानचा २० वा हप्ता?

## या शेतकऱ्यांच्या खात्यात २००० रुपये जमा होणार नाहीत

तुम्ही जर पंतप्रधान किसान योजनेचा लाभ घेत असाल, तर तुमच्यासाठी ही बातमी महत्वाची आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा २० वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात कधी जमा होणार असा सवाल उपस्थित केला जात आहे. तर लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात जीएम किसानचा २० वा हप्ता जमा होणार आहे. सरकार रक्कम हस्तांतरित करण्यापूर्वी, तुमचे नाव लाभार्थी यादीत आहे का? तसेच तुम्ही तुमचे अपडेट केली आहे का? हे पाहणं गरजेचं आहे. हे महत्वाचे काम केले नाहीतर २००० रुपये जमा होणार नाहीत.

पंतप्रधान किसान योजनेचा पुढील हप्ता कधी येणार?

या योजनेअंतर्गत, सरकार शेतकऱ्यांना वर्षातून तीनदा आर्थिक मदत देते. एप्रिल-जुलै, ऑगस्ट-नोव्हेंबर आणि डिसेंबर-मार्च दरम्यान. शेवटचा म्हणजेच १९ वा हप्ता २४ फेब्रुवारी २०२५ रोजी जारी करण्यात आला आहे. अशा परिस्थितीत, २० वा हप्ता जूनच्या कोणत्याही आठवड्यात शेतकऱ्यांच्या खात्यात येऊ शकतो असे मानले जाते. मात्र, सरकारने अद्याप कोणतीही अधिकृत तारीख जाहीर केलेली नाही.



पंतप्रधान किसान योजना म्हणजे काय?

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत, सरकार दरवर्षी पात्र शेतकऱ्यांना ६००० रुपयांची ची मदत देते. ही रक्कम तीन हप्त्यांमध्ये थेट त्यांच्या बँक खात्यात हस्तांतरित केली जाते. शेतकऱ्यांना शेतीच्या खर्चात काही प्रमाणात दिलासा देणे हा त्याचा उद्देश आहे. परंतु ही मदत फक्त अशा शेतकऱ्यांनाच उपलब्ध आहे ज्यांची माहिती पूर्ण आणि बरोबर आहे.

यादीत तुमचे नाव कसे तपासाल?

जर तुम्हाला तुमचे नाव लाभार्थी यादीत आहे की नाही हे पहायचे असेल तर तुम्हाला पीएम किसान वेबसाइट .. ला भेट द्यावी लागेल. तिथे 'लाभार्थी यादी' वर क्लिक करून, तुमचे राज्य, जिल्हा, ब्लॉक आणि गावाची माहिती भरा. यानंतर, ' ' वर क्लिक केल्यावर यादी उघडेल ज्यामध्ये तुम्ही तुमचे नाव पाहू शकता.

अपडेट केले नाही तर पेमेंट थांबवले जाऊ शकते

जर तुम्ही अजून केली नसेल, तर तुमचा पुढील हप्ता थांबू शकतो. पीएम किसान योजनेअंतर्गत नोंदणीकृत प्रत्येक शेतकऱ्याला ईकेवायसी करणे अनिवार्य आहे. यासाठी, तुम्ही द्वारे ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण करु शकता किंवा जवळच्या केंद्रात जाऊन बायोमेट्रिक करू शकता. ऑनलाइनसाठी, फक्त वेबसाइटला भेट द्या, पर्याय निवडा, आधार क्रमांक आणि नोंदणीकृत मोबाइल नंबर प्रविष्ट करा, मिळाल्यानंतर सबमिट करा.

या कारणामुळं हप्ता जमा होणार नाही

बऱ्याचदा, शेतकऱ्यांचे बँक खात्याची माहिती अपूर्ण किंवा चुकीची असल्याने त्यांचे हप्ते थांबतात. जसे की चुकीचा कोड, खाते बंद करणे, आधार बँकेशी लिंक न करणे किंवा एकापेक्षा जास्त वेळा अर्ज करणे. याशिवाय, जर कोणताही सदस्य आयकर भरत असेल तर तो कुटुंब नियोजनासाठी पात्र मानला जात नाही. काही प्रकरणांमध्ये, फॉर्ममधून महत्त्वाची माहिती गहाळ असते, ज्यामुळे हप्ता येण्यासही अडथळा येतो.

बँक तपशील आणि आधार कार्ड देणे आवश्यक

या योजनेअंतर्गत मिळणारे सर्व पैसे थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात येतात. यासाठी शेतकऱ्याने त्याच्या बँक खात्याची आणि आधार कार्डची माहिती देणे आवश्यक आहे. जर तुम्ही ही माहिती दिली नसेल तर तुम्हाला कोणताही फायदा मिळणार नाही. म्हणून, वेळेवर तुमचे तपशील तपासणे चांगले.


## दुधिया मालदा आंब्याची विशेषत:

आंबा हा 'फळांचा राजा' आहे हे आपल्या सर्वांना माहीतच आहे. त्यातच हापूस आंबा म्हटले की 'देशाची शान' असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. पण भारतात हापूस व्यतिरिक्त आंब्याच्या प्रजाती आहेत ज्या त्यांच्या चवीमुळे आणि वेगळेपणा मुळे प्रसिद्ध आहे. अशाच एका आंब्याच्या प्रजातीचे नाव आहे 'दुधिया मालदा'. गंगेच्या पाण्यातून मिळालेला अमृतसर असे या आंब्याचे वर्णन करण्यात येते. बिहारमधील पाटण्यातील या आंब्याची चव आणि गोडवा इतकी अप्रतिम आहे की एकदा या आंब्याची चव घेणारा या आंब्याला विसरू शकत नाही असे म्हणतात. दुधिया मालदा आंबा आतून मऊ आणि रसाळ आणि अप्रतिम गोडवा असलेला आहे. या आंब्याचा गर मऊ आणि दुधासारखा असतो. त्यामुळेच याला 'दुधिया मालदा' असे नाव मिळाले आहे. या आंब्याची साल पातळ आणि हलकी असते. त्यामुळे तो खाण्यास खूप सोयीस्कर असतो. दुधिया मालदा आंब्याचा सुगंध इतर आंब्यांपेक्षा वेगळा आणि आकर्षक असतो. दुधिया मालदा आंब्याची सर्वात अनोखी गोष्ट म्हणजे त्याला दुधातून सिंचन केले जाते.

'दुधिया मालदा' आंब्याचा इतिहास : लखनऊचे नवाब फिदा हुसेन यांना दूध आणि आंब्याची खूप आवड होती. त्यांनी पाटण्यातील दिघा येथे दुधाचे सिंचन केलेले आंब्याचे रोप लावले होते. या आंब्याला ते दुधाने सिंचन करत होते. यातून अनेक दिवसांनी 'दुधिया मालदा' नावाची अद्भुत प्रजाती तयार झाली.

दुधिया मालदा आंब्याची लोकप्रियता : दुधिया मालदा आंबा आजही तितकाच लोकप्रिय आहे.

गेल्या वर्षी ३३ देशांमध्ये हे आंबे निर्यात करण्यात आले होते. अमेरिका, इंग्लंड, जपान, दुबई अशा अनेक देशांमध्ये हा आंबा आवडीने खाल्ला जातो. विदेशातून दरवर्षी या आंब्याची ऑर्डर येते. हा आंबा जून मध्ये पिकतो आणि १०० रुपये किलो दराने विकला जातो.



## मासेपालनासाठी शेणाचा असा करा वापर



शेतीसोबतच शेतकरी मत्स्यपालन मोठ्या प्रमाणावर करतात. यातून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळते. याशिवाय मत्स्यपालनासाठी सरकारकडून शेतकऱ्यांना आर्थिक मदतही केली जाते. काहीवेळा शेतकऱ्यांना मत्स्यपालनाशी संबंधित फारशी माहिती नसल्याने मत्स्यपालनात नुकसान सहन करावे लागते. त्यामुळे आज आपण मत्स्यपालनाशी संबंधित अशा तंत्रांबद्दल जाणून घेणार आहोत. ज्याचा अवलंब करून मत्स्यपालनातून चांगले उत्पादन मिळवू शकतात.

मत्स्यपालनासाठी तलावाची खोली पाच ते सहा फूट असावी जेणेकरून माशांची वाढ झपाट्याने होईल. पाच ते सहा फूट खोल तलावामध्ये सूर्यकिरण प्लँक्टन उचलतात आणि तलावाच्या पृष्ठभागावर पोहोचतात. त्यामुळे तलावाच्या खोलीपर्यंत प्लँक्टन आढळून येतो. विशेष म्हणजे पाण्याच्या वेगवेगळ्या पातळ्यांवर प्लवकांचे प्रमाणही वेगवेगळे असते. वरच्या स्तरावर जास्त प्रकाश पडल्यामुळे एकूण प्लवकांपैकी सुमारे ६० टक्के येथे उपस्थित आहे. तर तलावाच्या मधल्या आणि खालच्या पातळीवर २० टक्के प्लँक्टन उपलब्ध आहे. यामुळे सर्व मासे वेगवेगळ्या स्तरावर अन्न शोधतात. संमिश्र मत्स्यपालन वापरा : कॉमन कॉर्प आणि कतला वरच्या आणि मध्यम स्तरावर अन्न शोधतात. तर सिल्व्हर कॉर्प आणि नॅनी खालच्या स्तरावर जेवण करतात. म्हणून संपूर्ण तलावाचे विविध स्तरांवर शोषण करण्यासाठी संमिश्र मत्स्यसंवर्धनाचा वापर केला पाहिजे. विशेषत: मत्स्य शेतकरी तलावात मस्त्य फीड किंवा धान्य टाकतात मात्र पैशाअभावी त्यांना योग्य प्रमाणात चारा मिळत नाही. त्यामुळे माशांची वाढ वेगाने होत नाही. अशा स्थितीत मत्स्य उत्पादकांना फारसा फायदा मिळत नाही.

शेणामुळे माशांचे वजन वाढेल : जर शेतकऱ्यांकडे माशांचे खाद्य खरेदी करण्यासाठी पैसे नसतील तर ते स्वत: घरी माशांचे खाद्य तयार करू शकतात. यासाठी शेतकरी गाई-म्हशींच्या शेणाचाही वापर करू शकतात. गाईच्या शेणावरही मासे जगू शकतात. शेतकरी थेट तलावात शेण टाकू शकतात. याशिवाय शेळीची विष्ठाही वापरता येते. शेळीची विष्ठा पावडरमध्ये बारीक करून तळ्यात मिसळा, जे चारा म्हणून काम करेल. शेळीची विष्ठा पाण्यात सहज विरघळते, त्यामुळे मासे ते सहज खाऊ शकतात.

सुरुवातीला २ हजार किलो शेण टाका : भारतीय कृषी संशोधन परिषदेने (आयसीएआर) केलेल्या संशोधनात हे सिद्ध झाले आहे की, शेणात असलेले घटक खाल्ल्याने मासे जलद वाढतात.

यामुळेच आयसीएआरने माशांसाठी ग्लोबल गोळ्याही बनवल्या आहेत. याचे कारण म्हणजे शेणात नायट्रोजन मोठ्या प्रमाणात आढळतो आणि मासे ते खातात तेव्हा त्यांचे वजन झपाट्याने वाढते. एक हेक्टरमध्ये मत्स्यशेती सुरू केल्यास प्रथम तलावात २ हजार किलो शेण घाला आणि त्यानंतर दरमहा १ हजार किलो शेण घाला. त्यामुळे माशांचे वजन झपाट्याने वाढेल आणि तुमचे उत्पन्नही वाढेल.

## दिन विशेष

### जागतिक दिवस:
### राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन : भारत.
### मातृत्व दिन

### महत्वाच्या घटना

१५०२ : ख्रिस्तोफर कोलंबस आपल्या ४ थ्या आणि अखेरच्या सफरीवर वेस्ट इंडिज बेटांकडे निघाला.
१८११ : चँग आणि एंग (बंकर) या प्रसिद्ध सयामी जुळ्यांचा एका चिनी दांपत्याच्या पोटी जन्म. (मृत्यू: १७ जानेवारी १८७४)
१८५७ : पहिला भारतीय स्वातंत्र्य संग्राम स्वातंत्र्यसैनिकांनी दिल्ली शहर जिंकले.
१८५८ : मिनेसोटा अमेरिकेचे ३२ वे राज्य झाले.
१८६७ : लक्झेंबर्गला स्वातंत्र्य मिळाले.
१८७८ : महाराष्ट्रातील पुणे शहराच्या हिराबागेत मराठी ग्रंथकारांचे पहिले संमेलन भरले होते. यालाच अखिल भारतीय साहित्य संमेलन म्हणून संबोधले जाते.
१८८८ : ज्योतिबा फुले यांना 'महात्मा' ही पदवी देण्यात आली.
१९२० : स्त्रियांना पदवीपरीक्षेसाठी प्रवेश देण्याचा ऑक्सफर्ड विद्यापिठाचा निर्णय.
१९२७ : चलत चित्र कला व विज्ञान अकादमीची स्थापना. ही संस्था दरवर्षी ऑस्कार पुरस्कार बहाल करते.
१९४९ : इस्त्रायलचा संयुक्त राष्ट्रांत समावेश झाला.
१९४९ : सियाम या देशाने अधिकृतरीत्या दुसऱ्यांदा आपले नाव बदलुन थायलंड केले.
१९५१ : गझनीच्या महंमदने उध्दवस्त केलेया बारा ज्योतिर्लिंगापैकी एक सोमनाथ या मंदिरात शिवलिंग प्रतिष्ठापना डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते झाली.
१९८७ : गोव्याला स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळाला.
१९९६ : माउंट एव्हरेस्ट आपत्ती: एकाच दिवसात माउंट एव्हरेस्टच शिखर चढणाऱ्या ८ लोकांचे निधन झाले.
१९९८ : २४ वर्षांनंतर भारताने पुन्हा राजस्थानच्या वाळवंटातील पोखरणच्या परिसरात हायड्रोजन बॉम्बनिर्मितीसाठीच्या साधनासह तीन यशस्वी आण्विक चाचण्या केल्या.
१९९८ : राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन
१९९९ : टेनिस सम्राज्ञी स्टेफी ग्राफ हिने जर्मन खुल्या टेनिस स्पर्धेत आपल्या कारकिर्दीतील १,००० वा सामना खेळण्याचा एक वेगळा विक्रम प्रस्थापित केला

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८९५ : जे. कृष्णमुर्ती, भारतीय तत्त्वज्ञानी.
१९०४ : स्पॅनिश चित्रकार साल्वादोर दाली यांचा जन्म. (मृत्यू: २३ जानेवारी १९८९)
१९१२ : भारतीय-पाकिस्तानी लेखक आणि पटकथालेखक सादत हसन मंटो यांचा जन्म. (मृत्यू: १८ जानेवारी १९५५)
१९१४ : संगीत रंगभूमीला नवचैतन्य देणार्या गायिका आणि अभिनेत्री ज्योत्स्ना भोळे यांचा जन्म. (मृत्यू: ५ ऑगस्ट २००१)
१९१८ : क्वांटम इलेक्ट्रोडायनॅमिक्स मधील मूलभूत संशोधनाबद्दल नोबेल पारितोषिक मिळवणारे अमेरिकन पदार्थवैज्ञानिक रिचर्ड फाइनमन यांचा जन्म. (मृत्यू: १५ फेब्रुवारी १९८८)
१९४६ : कृत्रिम हृदय विकसित करणारे कार्डियोलॉजिस्ट रॉबर्ट जार्विक यांचा जन्म.
१९५० : सुप्रसिद्ध भारतीय हिन्दी-मराठी चित्रपट अभेनिते सदाशिव दत्ताराय अमरापूरकर यांचा जन्मदिन.
१९६० : अभिनेता सदाशिव अमरापूरकर यांचा जन्म.
१९७२ : जेकब मार्टिन, भारतीय क्रिकेट खेळाडू.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७१ : ब्रिटिश गणितज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ, रॉयल अ‍ॅस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचे संस्थापक सर जॉन विल्यम हर्षेल यांचे निधन. (जन्म: ७ मार्च १७९२)
१८८९ : जॉन कॅडबरी, इंग्लिश उद्योगपती.
१८८५ : लोकनेते कृष्णमोहन बंदोपाध्याय.
१९९३ : शाहू मोडक, अभिनेते.
२००४ : चित्रकार व नृत्यदिग्दर्शक कृष्णदेव मुळगुंद यांचे निधन. (जन्म: २७ मे १९१३)
२००९ : भारतीय नौसेनाधिपती सरदारिलाल माथादास नंदा यांचे निधन. (जन्म: १० ऑक्टोबर १९१५)

# जमिनीच्या पोषणासाठी संतुलित अन्नद्रव्य महत्वाचे

जमिनीतील उपलब्ध अन्नद्रव्यांचे प्रमाण पीक पोषणाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे असते. जमिनीत एकूण अन्नद्रव्य जास्त प्रमाणात असेल तरी ही अन्नद्रव्ये पिकांची मुळे शोषून घेऊ शकतील अशा स्वरूपात असणे गरजेचे असते. याशिवाय हवामान, जमिनीचा प्रकार, पीक पद्धती अशा निरनिराळ्या घटकांमुळे या प्रमाणावर परिणाम होत असतो आणि ते प्रमाण सतत बदलत असते. म्हणूनच माती परिक्षणाच्या आधारे हे प्रमाण जाणून घेणे महत्त्वाचे आहे. माती परीक्षण अहवालानुसार पिकांची गरज लक्षात घेऊन खतांची शिफारशी केल्या जातात. रासायनिक खते, सेंद्रिय खते, हिरवळीची पिके आणि जिवाणू संवर्धकांचा एकात्मिक वापर करून जमिनीची सुपीकता टिकवून पीक उत्पादन वाढविता येते. माती परीक्षण अहवालामध्ये सामू,क्षारता,मुक्त चुन्याचे प्रमाण, उपलब्ध नत्र, स्फुरद, पालाश, लोह, जस्त, तांबे, बोरॉन व मँगेनीज इत्यादीचे प्रमाण नमूद केलेले असते.

सामू : सामू हा सर्वसाधारण प्रमाणे ६.५ ते ७.५ पर्यंत असावा कारण या दरम्यानच वनस्पतींना लागणारी बहुतेक अन्नद्रव्ये उपलब्ध होतात. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भातील जमिनीचा सामू किंचित विम्ल ते अतिशय विम्ल (सामू ७.५ ते ९) प्रकारचा आहे. सामू ८.५ पेक्षा जास्त असलेल्या अतिविम्ल चोपण जमिनीमध्ये भूसुधारक म्हणून जिप्समचा शेणखतातून वापर करावा. चुनखडीयुक्त चोपण जमिनीची सुधारणा करताना जिप्सम ऐवजी गंधकाचा शेणखतातून वापर करावा. सामू ६.५ पेक्षा कमी असल्यास त्याला आम्ल जमिनी म्हणतात. विशेषतः कोकणातील जमिनीचा सामू जास्त आम्लयुक्त असतो.अशा जमिनी सुधारण्यासाठी चुन्याचा शेणखतातून वापर करावा.

क्षारता : ६.० पेक्षा कमी आम्लयुक्त जमीन, ६ ते ८ सर्वसाधारण जमीन, ८ ते ९ विम्ल होण्याच्या मार्गावर आणि ९ पेशा जास्त विम्लयुक्त जमीन.

क्षारांचे प्रमाण प्रयोगशाळेत इलेट्रिकल कंडक्टिव्हिटी या उपकरणाद्वारे मोजले जाते. मातीतील विद्युत वाहकता (क्षारता) १.०० डेसी. सी./ मीटर पेक्षा जास्त असेल तर क्षारयुक्त जमीन म्हणतात. अशा जमिनीच्या पृष्ठभागावर विरघळलेल्या क्षारांचा पांढरा थर दिसून येतो. मातीची क्षारता सर्वसाधारपणे ०.१० ते ०.९० डेसी सी/मीटर या दरम्यानच असावी.त्यापेक्षा जास्त असल्यास चर खोदून जमिनीस निचऱ्याची व्यवस्था करावी. जास्तीत जास्त सेंद्रिय खतांचा वापर करावा. हिरवळीची पिके जमिनीत गाडावीत. चांगल्या प्रतीचे पाणी सिंचनास वापरून अतिरिक्त क्षारांचा निचरा करावा. चांगल्या प्रतीच्या पाण्याची क्षारता ०.५ डेसी सी/ मीटर पेक्षा कमी असते. ही क्षारता २.५डेसी.सी./मीटर पेक्षा जास्त असल्यास असे पाणी सिंचनास अयोग्य समजले जाते. पाण्याची क्षारता ३.१५ डेसी सी/ मीटर पेक्षा जास्त असल्यास ठिबकसाठी अयोग्य समजले जाते.

सेंद्रिय कर्ब : १.०० पर्यंत सर्वसाधारण, १.०१ ते २.०० पीक व उगवणीस नुकसानकारक,

२.०१ ते ३.०० क्षार संवेदनशील, पिकांच्या वाढीस नुकसानकारक. जमिनीत सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण जेवढे जास्त तेवढे ते पीक उत्पादन आणि जमिनीच्या भौतिक गुणधर्माच्या संवर्धनाच्या दृष्टीने चांगले असते. सेंद्रिय कर्बाची टक्केवारी शोधल्यास जमिनीतील एकूण नत्राच्या प्रमाणाचाही अंदाज लागतो. सर्व वनस्पती, प्राणी आणि जिवाणूंचे कुजलेले आणि कुजलेले जमिनीतील अवशेष म्हणजेच सेंद्रिय द्रव्य होय.

जमिनीतील एकूण सेंद्रिय द्रव्यामध्ये वनस्पतीचे अवशेष जास्त आढळतात. सेंद्रिय द्रव्यात जवळपास ५८ टक्के कार्बन असतो. सेंद्रिय द्रव्य वनस्पतीच्या वाढीसाठी लागणाऱ्या आवश्यक मूलद्रव्याच्या साठवणीचे केंद्र असल्यामुळे जमिनीच्या उत्पादकतेचा निर्देशांक आहे. सेंद्रिय द्रव्य धन आयन विनिमय क्षमता वाढविण्यासाठी, जमिनीची योग्य रचना राहण्यासाठी, जमिनीत ओलावा आणि हवेचे सुयोग्य प्रमाण राखण्यासाठी उपयुक्त असते. जमिनीत मिसळलेल्या सेंद्रिय द्रव्याचे सूक्ष्म जिवांमुळे सतत विघटन होत असते.जमिनीमधील सेंद्रिय कर्बाची सर्वसाधारण मर्यादा ०.४० ते०.६० टक्के योग्य मानली जाते. अशा जमिनीचे जैविक, भौतिक व रासायनिक गुणधर्म चांगले असतात. या जमिनीत पिकांची पोषण क्षमता योग्य असते. जमीन निरोगी राहण्यास मदत होते. त्यामुळे शेतीमध्ये शेणखत, कंपोस्ट व इतर सेंद्रिय पदार्थांचा वापर फायदेशीर असतो.



# प्रशासनाची 'सस्ती अदालत' म्हणजे प्रसिद्धी मिळवण्यासाठी केलेली स्टंटबाजी







लिंबागणेश । प्रतिनिधी

एकीकडे शेतकऱ्यांनी अतिक्रमित शेतरस्ते,पाणंद रस्ते मोकळे व्हावेत ,त्यांना जलद न्याय मिळावा हा उद्देश समोर ठेवून प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या चौथ्या शुक्रवारी सस्ती अदालत हा उपक्रम तहसील कार्यालय, मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी राबवला जाणार असून याचा लाभ शेतकऱ्यांना होणार आहे अशी विविध दैनिकातून प्रसिद्धी जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येऊन स्वतःची पाठ थोपटून घेतली जात आहे. दुसरीकडे लोकसहभागातून तयार केलेले शेत रस्ते मोकळे करून देण्यात यावेत यासाठी वारंवार जिल्हा प्रशासन,तहसील प्रशासन यांच्या दारी खेटे मारून त्यांचे जोडे झिजले आहेत. परंतु त्यांना जिल्हा प्रशासन शेत रस्ता मोकळा करून देण्यास दिरंगाई करत आहे. त्यामुळे एकंदरीतच शेत रस्ते मोकळे करण्यासाठी राबवले जाणारे सस्ती अदालत हा जिल्हा प्रशासनाचा प्रसिद्धी मिळवण्यासाठी स्टंटबाजी असून जिल्हा प्रशासनाने जलद गतीने शेतकऱ्यांना न्याय देऊन शेत रस्ते,पाणंद रस्ते मोकळे करून द्यावेत.तसेच ग्रामीण भागात शेत वस्तीवर जाण्यासाठी दळणवळणाची साधने व मजुरांच्या हाताला काम मिळावे या उदात्त हेतूने सुरू केलेली मातोश्री ग्राम समृद्धी शेत /पाणंद रस्ते योजनेंतर्गत शेत रस्ते पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात यावेत.अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

## पावसाळ्यापुर्वी शेत रस्ते

पूर्ण हवेत या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले होते.रस्ते मोकळे करण्यासाठी शेतकरी शासनाच्या दरबारी वारंवार चकरा मारत असूनही त्यांना न्याय मिळत नाही. सध्या शेत रस्ते , पाणंद रस्ते मोकळे करण्यासाठी राबवली जाणारी सस्ती अदालत योजना केवळ स्टंटबाजी असून शेतकऱ्यांना प्रशासनाने तातडीने न्याय द्यावा व पावसाळ्यापूर्वी शेत रस्ते, पाणंद रस्ते पूर्ण करण्यासाठी सहकार्य करावे अशी मागणी डॉ . गणेश ढवळे लिंबागणेशकर केली आहे.

मुळकवाडी- मसेवाडी शिवरस्ता मोकळा करून देण्यात यावा यासाठी शेतकऱ्यांनी आक्षेप घेतल्यानंतर ३ वर्षांपूर्वी भूमी अभिलेख कार्यालयात २१,००० रुपये मोजणी फीस भरली. त्यानंतर दोन वर्ष भूमी अभिलेखचे कर्मचारी मोजणी करण्यासाठी आलेच नाहीत. सहा महिन्यापूर्वी १ ऑक्टोबर रोजी लिंबागणेश येथे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली महसूल मंडळाची बैठक झाली होती. तेव्हा मसेवाडी येथील ग्रामस्थांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना लेखी निवेदन दिल्यानंतर त्यांनी भूमी अभिलेखच्या कर्मचाऱ्यांना आदेश देऊन खुणा निश्चिती करून देण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर खुणा करून दिल्या मात्र दोन तीनशे शेतकऱ्यांपैकी चार ,पाच शेतकऱ्यांना त्या मान्य नसल्याने त्यांनी रस्ता अडवला असून लोक सहभागातून ४-५ लाख रुपये खर्च खर्चून ७० टक्के रस्ता तयार झाला असून केवळ अर्धा किलोमीटर रस्ता बाकी आहे. पावसाळा तोंडावर आला असुन पावसाळ्यात खते ,बि बियाणे, आणि शेतातील शेतीमाल आदी ने आण करण्यासाठी अडचण येते. त्यामुळे पावसाळ्यापुर्वी महसूल प्रशासनाला आम्हाला तातडीने रस्ता मोकळा करून देण्यात यावा अशी आमची मागणी असल्याचे शाकींदर काटकर यांनी सांगितले. पावसाळ्यात शाळा सुरू झाल्यानंतर शाळकरी मुलांना गुडघाभर चिखलातून शाळेत जायला लागतं. आठवडी बाजार,माळवं, रात्री अपरात्री दवाखान्यात जायचं म्हणलं तरी आम्हाला मोठी अडचण आहे त्यामुळे पावसाळ्या अगोदर रस्ता करण्यात यावा अशी मागणी छाया निर्मळ यांनी केली आहे.

तहसीलदार यांच्या आदेशानुसार भुमि अभिलेख कर्मचाऱ्यांनी करून दिलेल्या खुणा ४-५ शेतकऱ्यांना मान्य नाही म्हणून रस्ता काम रखडले : रामकिसन कदम सरपंच मुळुकवाडी यांनी सांगितले. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी स्वतः भेट देऊन भुमि अभिलेख कर्मचाऱ्यांना ३३ फुट रस्त्यासाठी खुणा करून दिल्या होत्या.२०० शेतकऱ्यांना या मान्य असुन ४-५ शेतकऱ्यांना मान्य नसल्याने त्यांनी काम अडवल्याने ७० टक्के काम पूर्ण झाले असुन ३० टक्के काम अपूर्ण आहे. प्रशासनाने रस्ता मोकळा करण्यास मदत करावी.अशी मागणी सरपंच मुळुकवाडी रामकिसन कदम यांनी केली आहे. ग्रामीण भागात शेतवस्तीवर जाण्यासाठी दळणवळणाची साधने व मजुरांच्या हाताला काम मिळावे या उदात्त हेतूने मातोश्री ग्राम समृद्धी शेत/ पाणंद रस्ते योजना अस्तित्वात आणली.

## थोडक्यात

### शिवलीला पाटील यांचे कीर्तन



नेकनूर : बीड तालुक्यातील नेकनूर येथील मा. जी प सदस्य आणि मा सरपंच सुधाकर कल्याणकर यांच्या ७१ व्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्त दि १२ मे सकाळी १० वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह भ प शिवलीलाताई पाटील यांचे कीर्तन कल्याणकर नगर येथे होणार आहे तरी नेकनूर सह परिसरातील नागरिकांनी या कीर्तन सोहळ्यास उपस्थित राहून शोभा वाढवावी असे आवाहन युवा नेते राहुल भैय्या कल्याणकर, रोहित कल्याणकर, आनंद कल्याणकर , उमेश कल्याणकर, विनोद कल्याणकर, महेश कल्याणकर अभय कल्याणकर, निखिल कल्याणकर, चैतन्य कल्याणकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### आंतरकर महाराज यांचे कीर्तन

बीड : विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील नववी पुण्यतिथी वैशाख शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. विष्णु महाराज आंतरकर श्रीक्षेत्र देवाची आळंदी यांचे सोमवार दिनांक १२ मे २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी जुजगव्हाण यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

## रक्तदान शिबिरास मुस्लिम तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद- उल्हास गिराम

बीड। प्रतिनिधी

पाकिस्तानी दहशतवाद्या विरोधात भारतीय सैन्यानी सुरु केलेल्या युद्धात शहीद भारतीय जावनाच्या शौर्याप्रति सदभावना म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी आज बीड शहरात रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरास देशाभीम असणाऱ्या तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. विशेष म्हणजे मुस्लिम बांधवानी ही रक्तदान करून देशाप्रति सदभावना दाखवली.

याशिबिरास सह संपर्क प्रमुख बाळासाहेब अंबुरे, दैनिक झुंजार नेता चे संपादक अजित वरपे, दैनिक सामना चे जिल्हाप्रतिनिधी उदय जोशी सर,



जिल्हा संघटक नितीन धांडे, उपजिल्हाप्रमुख हनुमंत जगताप, कर्मवीर परिवाराचे सोमनाथ धांडे, गणेश जाधव, राहुल जामकर, नंदकुमार येवले, सुरेश तात्या शेटे, माजी नगरसेवक सुधीर भांडवले, यांनी भेट दिली. या शिबिरास उपजिल्हाप्रमुख संजय महाद्वार, लक्ष्मण बहिरवळ सुशील पिंगळे, रतन तात्या गुजर, नवनाथ प्रभाळे, सरपंच प्रदीप कोटुळे, अतुल लोणकर, योगेश वादे, अझर सय्यद, ज्ञानेश्वर दाभाडे, सुजित गिराम, गिरीश गिराम, वैभव प्रभाळे, महेश भोसले, सौरभ इंगोले यासह अनेक तरुणांनी रक्तदान शिबिरास सहभाग नोंदवला.

## भव्य धम्मरॅलीत मोठ्या संख्येने सहभागी व्हा - डॉ.साळवे

माजलगाव। प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा तालुका याजलगावच्या वतीने तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५६९ व्या जयंती विविध उपक्रमाने साजरी करण्यात येत आहे त्या अनुशंगाने दि १ मे २०२५ ते ५ मे २०२५ या कालावधीत त्रिसरण बुद्ध विहार चिंचगव्हाण येथे महिला उपासिका शिबीर संपन्न झाले,दि ४ मे २०२५ रोजी बुद्ध विहार संम्राट अशोक नगर येते अंधश्रद्धा निर्मूलन शिबीर संपन्न झाले आणी दि ३ मे २०२५ पासुन पुज्य भन्ते दिपरत्न यांच्या नेतृत्वात सांची बुद्ध विहार,डॉ आंबेडकर



भवन केसापुरी कॅम्प येते १० दिवशीय बौद्धाचार्य श्रामणेर शिबीर चालु आहे त्या शिबीराचा समारोप दि १२ मे २०२५ सोमवार वैशाख पौर्णिमा या दिवशी सकाळी ८.वा डॉ आंबेडकर चौक ते सांची बुद्ध विहार आसी भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे तसेच ठिक १० वा पंचरंगी धम्म ध्वजाचे ध्वजारोहण भारतीय बौद्ध महासभा बीड पुर्वचे जिल्हा अध्यक्ष बी बी धन्वे यांच्या हस्ते होईल तसेच संघ भोजन होऊन पुज्य भन्ते दिपरत्न यांची धम्मदेशना होऊन शिबीराचा समारोप होईल.या भव्य धमरॅलीस धम्म उपासक उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थीत राहुन धम्म चळवळ गतिमान करण्यास सहकार्य करावे असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे यांनी केले

## शिवणीमध्ये बुद्ध जयंती महोत्सव

### तथागत बुद्ध रुप प्रतिष्ठापना,अनावरण सोहळा:भिक्खु धम्मशिल थेरो

बीड/प्रतिनिधी । प्रतिनिधी

या जगाला प्रज्ञा, शिल, करुणेची शिकवण देणाऱ्यातथागत सिध्दार्थ गौतम बुद्ध यांच्या २५६९ व्या जयंती निमित्ताने तथागत बुद्ध रुप प्रतिष्ठापना व अनावरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.हा बुद्ध जयंती महोत्सव बीड तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर, येथे सोमवार (दि.१२) मे रोजी संपन्न होत आहे. प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था,बीड विनीत बुद्ध जयंती महोत्सवात उपस्थित रहावे असे आवाहन मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांनी केले आहे.

प्रसिध्दी दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे की, कार्यक्रमाचे उदघाटक डॉ.भिक्खु उपगुप्त माथेरो तर अध्यक्ष म्हणून भिक्खु इंदवंस्स, प्रमुख उपस्थिती भिक्खु चंद्रमुणी असणार आहेत. प्रमुख धम्मदेसना भिक्खु महाकाश्यप थेरो, भिक्खु धम्मघोष, भिक्खु पय्यावर्धन तर प्रमुख पाहुणे म्हणून बीड कलेक्टर विवेक जॉन्सन, सीईओ आदित्य जीवने, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त प्रदिप भोगले, नायब तहसीलदार सुहास हजारे, समाज कल्याण अधिकारी दत्तात्रय क्षीरसागर, अभियंता व्ही.एल.कांबळे, संपादक कुणाल कांबळे असणार आहेत. विशेष अतिथी म्हणून एमएसआरडीसी मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक इंजि.अनिल गायकवाड उपस्थित असणार आहेत. दरम्यान बुद्ध जयंती महोत्सवात उपस्थित रहावे असे आवाहन मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांनी केले आहे.

### बीडमध्ये पहिल्यांदाच होणार रात्रभर महापरित्राण पाठ



### श्रीलंकेचे प्रशिक्षिक भिक्खु राहणार उपस्थित

बीडमध्ये पहिल्यांदाच श्रीलंका येथील भिक्खु अश्वजित थेरो, भन्ते शीलवान, भिक्खु बुद्धभुषण, उपस्थित राहणार असून सोमवार (दि.१२) मे रोजी सकाळी ९ ते सकाळी ६ पर्यंत रात्रभर महापरित्राण पाठ होणार आहे. उपासकांनी सहभागी होवून पुण्य अर्जित करावे.असे आवाहन करण्यात आले आहे.

### असे होणार कार्यक्रम

बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथून सकाळी ८ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा इथपर्यंत तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीची मिरवणूक होईल. शिवणी येथील महाविर धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर येथे सकाळी ९ ते १२ सांस्कृतिक भिम बुद्ध गीतांचा कार्यक्रम, सकाळी १० ते १२ भोजनदान, दुपारी १ ते ४ वाजता भिक्खु संघाची धम्मदेसना होणार आहे.

## वारकरी संप्रदायाच्या भजनाचा सूर्य उगवणारे संत बंकटस्वामी महाराज-चैतन्य महाराज निंबोळे

बीड । प्रतिनिधी

वारकरी संप्रदायाच्या भजनाचा सूर्य उगवणारे संत बंकटस्वामी महाराज आहेत. गायन आणि वादन कला नाही तर साधना आहे. ज्या साधनेच्या जोरावर देव आपलासा करता येतो हे स्वामी महाराज यांनी सांगितले. असे प्रतिपादन श्री ह भ प चैतन्य महाराज निंबोळे यांनी केले.संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुताना ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, मुकुंदराज संस्थांचे मठाधिपती किसन महाराज पवार, गाथा कंठस्थ मारुती महाराज चोरमले , अर्जुन महाराज शिंदे,जनार्धन महाराज बांगर,श्री ह भ प नाना महाराज कदम. सुरेश महाराज जाधव, यांच्यासह हजारो भावी भक्तांची उपस्थिती होती..

बीडच्या श्रीक्षेत्र नेकनूर येथे वारकरी संप्रदायातील महान संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवास चौथ्या दिवसाचे कीर्तन पुष्प महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री ह भ प चैतन्य महाराज निंबोळे नाशिक कर यांचे संपन्न झाले. यावेळी त्यांनी

यारे नाचु प्रेमानंदे राम नामाचेनी छंदे म्हणा

### जातीपाती विसरून हिंदू नावाखाली सर्वजण एकत्र या



जयराम श्रीराम भवसिंधु तारक नाम ऐसी नामाची आवडी काळ गेला देशोधडी आवडीने नाम घोका म्हणे जनार्दन एका या संत एकनाथ महाराजांच्या अभंगावर चिंतन मांडले.हा अभंग आवाहन करणारा आहे. आज खऱ्या अर्थाने एकत्र होण्याची गरज आहे. कली युगात संघटन महंत्वाचे आहे..हिंदू नावाखाली एकत्र येताना जात पात विचारू नका. सर्वजण हिंदू आहोत म्हणून एक या असे आवाहन महाराजांनी केले. संगीत सोप आहे.पण भजन अवघड आहे असे संत बंकटस्वामी महाराज सांगत.. तसेच स्वामींनी सांगितल संगीत सोप भजन नाही. गायन आणि वादन कला नाही तर निष्ठेने करण्याची साधना आहे.संत ज्या कुळात जन्म घेतात ते कुळ पवित्र. एकनाथ महाराजांचे कुळ पवित्र आहे . तसचं स्वामी महाराजांचे कुळही परम पवित्र होते. सहज संगती संताची घडल्यास उद्धार होतो. माणूस जेवडा उंच भजन गातो तेवढी पापे जातात अस बंकटस्वामी महाराज म्हणायचे तसेच आत्माभुतिचे भजन सूर्य उदयाच्या अगोदर केले पाहिजे... संत बंकटस्वामीच्या वारकरी चाली गायल्याकी श्रोत्यामध्ये भक्ती आणि वैराग्य वाढते. कीर्तनात भजन महत्त्वाचे आहे..भजनाचा सागर मराठवाडा आहे .भजनाच्या बाबतीत तो वेडा ही आहे. तसेच परमार्थाचा बाले किल्ला बीड जिल्हा आहे.याच भूमीने जगाला भजनाचा आदर्श दिला.अस महाराज म्हणाले. राम नावासाठी सर्वांनी एकत्रित यावे असा संदेश महाराजांनी दिला. यावेळी साथ संगत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक भजन स्वरवैभव हरिभाऊ महाराज काळे,बिभीषण महाराज कोकाटे यांच्यासह संत बंकटस्वामी महाराज फडावरील सर्व टाळकरी मंडळी उपस्थित होते.

## पाटोद्यासाठी खरीप हंगामा करिता बी-बियांणे उपलब्ध

पाटोदा । प्रतिनिधी

यंदा मान्सून वेळेपूर्वी दाखल होण्याची शक्यता असल्याने सर्वत्र खरीप हंगामाची पेरणीपूर्व तयारी केली जात आहे पाटोदा तालुक्यातील शेतकरी शेतीच्या मशागतीत मग्न असून कृषी विभाग शेतकऱ्यांसाठी लागणारे बियाणे व खताचा पुरवठ्याचे नियोजन करीत आहेत. तालुक्यातील ४९ हजार हेक्टर वर सोयाबीनचा सर्वाधिक पेरा होतो यंदाही सोयाबीनचे क्षेत्र अधिक राहणार आहे यासाठी १२८६३ सोयाबीनचे बियाणे लागणार आहे. १४,८८ मॅट्रिक टन खते लागणार आहे. याकरिता कृषी विभाग नियोजन करीत असून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कृषी केंद्र चालक व बियाणे खताचा कंपन्यावर कृषी विभागाची नजर राहणार आहे अशी माहिती तालुका कृषी अधिकारी कल्याण पवार यांनी दिली. पाटोदा तालुक्याचे एकूण अंदाजीत पेरणी क्षेत्र. ५९ हजार १०० हेक्टर असून. ८३ टक्के क्षेत्र म्हणजे ४९ हजार हेक्टर फक्त सोयाबीन साठी राखीव आहे. त्यानंतर बाजरीचे २२०० हेक्टर. ४२२ क्विंटल बियाणे. उडीदाचे ४००० हेक्टर. २१० क्विंटल. मुगाचे बाराशे हेक्टर ४० क्विंटल. संकरित कापूस एक हजार हेक्टर १९ क्विंटल.क्षेत्र ठरवण्यात आले आहे शिवाय सूर्यफूल अन्य पिकाचे क्षेत्र हे अपेक्षित आहे खते फक्त अधिकृत विक्री केंद्रावरूनच शेतकऱ्यांना भेट द्यावीत कोणत्याही परिस्थितीत लिंग च्या माध्यमातून खते वाटप करू नये अशी स्पष्ट सूचना कंपन्यांना दिले आहेत यावर नियंत्रण ठेवण्यासाठी निरीक्षेची नेमणूक केली जात आहे त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक होणार नसण्याचा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. १०० मिलिमीटर पावसा आधी कुणीही पेरणी करू नये मान्सून वेळ आधी पोहोचेल असा अंदाज असला तरी शंभर मिलिमीटर पाऊस पडल्यानंतरच पेरणी करावे अशी आवाहन कृषी विभागाने शेतकऱ्यांना केले आहे यासाठी विभागाने जागृती मोहीम सुरू केली असून कृषी सहाय्यक गावात कार्यरत राहणार आहे. व्यापाऱ्यांच्या गैरव्यवहारावर किमतीवर कृषी विभागाचे नजर राहणार आहे.

# बीडजवळ भीषण अपघात, कारची लक्झरी बसला धडक; १५ वर्षीय मुलासह वडील ठार

बीड । प्रतिनिधी

**राज्यातील रस्ते अपघाताचे प्रमाण गेल्या काही वर्षात वाढल्याचे पाहायला मिळत असून केंद्रीय दळणवळणमंत्री नितीन गडकरी यांनी देखील याबाबत चिंता व्यक्त केली होती. वर्तमानपत्रात किंवा माध्यमांमध्ये सातत्याने अपघाताच्या बातम्या येत असून महामार्गावरच हे अपघात घडत असल्याचे दिसून येते. आता, बीड जिल्ह्यातील पाटोद्याजवळ एका भीषण अपघातात वडिल आणि मुलाचा दुर्दैवी अंत झाला आहे. दरम्यान, दोघांचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत.**

बीडच्या पाटोदा शहराजवळ पुण्याहून केजकडे जाणारी भरधाव वेगातील कार पुलाच्या कठड्याला धडकून ट्रॅव्हल्सवर जाऊन आदळली. या अपघातात अश्फाक शेख (४० वर्षे) आणि त्यांचा मुलगा अल्ताफ शेख (१५ वर्षे) हे दोघेही जागीच ठार झाले आहेत. पुण्यावरुन हे



दोघेही आपल्या गावी म्हणजेच केजकडे येत होते. मात्र, पाटोदाजवळ आले असता त्यांच्या कारचा अपघात झाला. चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने ती कार पुलाच्या कठड्याला धडकली. त्यानंतर तीन पलट्या खाऊन समोरून येणाऱ्या एका खासगी कंपनीच्या ट्रॅव्हल्सवर जाऊन आदळली. त्यात कारमधील दोघांचाही मृत्यू झाला. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच पाटोदा पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत कारमधून मृतदेह बाहेर काढले. त्यानंतर, मृतदेह पाटोदा ग्रामीण रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी दाखल करण्यात आले. याप्रकरणी अधिक तपास पोलीस करत आहेत.

सोलापुरात लक्झरी बस जळून खाक

सोलापूर-पुणे हायवेवरती हैदराबादकडून मुंबईकडे निघालेली लक्झरी बस अचानक पेटून जळून गेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. बेस्ट एक्सप्रेस नावाची लक्झरी बस नं . ०१ १८२४ ही हैदराबादकडून मुंबईकडे जात असताना चालू वाहनाने अचानक पेट घेतला. यावेळी स्थानिक व पोलिसांनी सतर्कता दाखवत गाडीतील प्रवाशांना तातडीने खाली उतरवले आणि अग्निशमक बोलवून आग विझवण्यास सुरुवात केली. दोन तासाच्या प्रयत्नानंतर आग विझली. मात्र, तोपर्यंत ही लक्झरी बस संपूर्णपणे जळून गेली होती. यात प्रवाशांचे प्राण वाचवण्यात पोलिसांना यश आले असले तरी गाडीच्या डीकीमधील बॅगा, मोबाईल, लॅपटॉप, आंबे, खाण्याचे साहित्य, मसाल्याचे वस्तू कपडे इत्यादी साहित्य पूर्णपणे जळून गेले आहे. ही बस हैदराबादची असून पोलीस या बसचा चालक अब्दुल इम्तियाज याच्याकडे चौकशी करीत आहेत.

## विदेशी दारू, महिंद्रा पिकअपसह ७ लाख ८८ हजाराचा मुद्देमाल जप्त



जालना । प्रतिनिधी

परतुर पोलिसांनी विदेशी दारू सह पकडला महेंद्रा पिक अप. ७,८८,८०० रुपये किमतीचा मुद्द्यामाल जप्त.

९मे रोजी पोलीस निरीक्षक सुरवसे यांना त्यांच्या गुप्त बातमी दारा मार्फत माहिती मिळाली वरून साईनगर परतुर येथे चार चाकी बोलेरो पिक अप गाडीमध्ये विदेशी दारूच्या मालाची चोरटी वाहतूक करीत आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने पोनि सुरवसे यांनी तात्काळ स्टाफ ला माहिती देऊन रवाना केले. त्यावेळी साईनगर येथे स्टाफ गेला असता सदर पिकप हे सरकारी दवाखान्याच्या दिशेने जात असताना दिसले त्याचा पाठलाग केला असता त्याला थांबवून पिकप ची झडती घेतली असता पिकप मध्ये विदेशी दारूचे ११ बॉक्स मिळून आले . बॉक्स व पिक अप जप्त करून पोलीस ठाणे परतुर येथे आरोपी

ओंकार उर्फ वंकर रामराव फटिंग रा साई नगर परतूर,

सोन्या सिंग प्रेमसिंग टाक रा साई नगर परतूर ,यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे . सदरची कारवाई श्री अजय कुमार बंसल पोलीस अधीक्षक , आयुष नोपनी अप्पर पोलिस अधीक्षक , दादाहरी चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली एम.टी सुरवसे, पोलिस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक केंद्रे , पोहेका/ अशोक गाडवे, पोका/अच्युत चव्हाण , पोका/राम हाडे, पोका/ दीपक आडे, पोका/ सतीश जाधव,यांनी केली असून पुढील तपास पोहेका अशोक गाढवे करीत आहेत.

# रुग्णाला दर्जेदार सेवा मिळायला हवी, त्यांनी यंत्रणांमध्ये पारदर्शकता, वेळेवर उपचार आणि स्वच्छतेवर भर द्यावा -जिल्हाधिकारी जॉन्सन

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केली जिल्हा रुग्णालयाची पाहणी

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज जिल्हा रुग्णालयाची अचानक पाहणी करत रुग्णसेवा, वैद्यकीय सुविधा आणि व्यवस्थापनाची सखोल माहिती घेतली. त्यांनी रुग्णालयातील विविध विभागांना भेट देऊन रुग्णांशी आणि कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधला.**

पाहणी दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी ओपीडी, इनडोअर वॉर्ड, औषध वितरण कक्ष, ऑपरेशन थिएटर, महिला व बालरोग विभाग, तसेच प्रयोगशाळा विभागांची तपासणी केली. रुग्णांकडून उपचार, औषधे,





स्वच्छता आणि कर्मचारी वर्गाच्या वागणुकीबाबत थेट माहिती घेतली. काही रुग्णांनी समाधान व्यक्त केले तर काहींनी किरकोळ अडचणी मांडल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी रुग्णालय प्रशासनाला सूचना दिल्या की, प्रत्येक रुग्णाला दर्जेदार सेवा मिळायला हवी. त्यांनी यंत्रणांमध्ये पारदर्शकता, वेळेवर उपचार आणि स्वच्छतेवर भर देण्याचे निर्देश दिले. या पाहणीत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत, आरएमओ डॉ. संतोष शहाणे, बाह्य विभागाचे आरएमओ डॉ. लक्ष्मीकांत, डॉ. हनुमंत पारखे, मुख्य अधीसेविका रमा गिरी, प्राचार्य डॉ. सुवर्णा बेदरे आणि इतर विभागप्रमुख उपस्थित होते. पाहणीच्या शेवटी जिल्हाधिकाऱ्यांनी चांगली सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचे कौतुक करून त्यांना शाब्बासकी दिली. काही विभागांमध्ये तातडीने सुधारणा करण्याचे आदेशही त्यांनी दिले. जिल्हाधिकाऱ्यांच्या या पाहणीमुळे आरोग्य यंत्रणेत जागरूकता वाढणार असून, नागरिकांना अधिक चांगल्या सेवा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. रुग्णालय प्रशासनाने त्यांच्या सूचनांचे तात्काळ पालन करण्याचे आश्वासन दिले आहे.

## गायक राज रायते यांचा तेली समाजाच्या वतीने आज भव्य राज्यस्तरीय सत्कार

बीड । प्रतिनिधी

**श्री संताजी नवयुवक मंडळ, महाराष्ट्र राज्य द्वारा आयोजित श्री संत गजानन नगरी, शेगाव येथे प्रथम राज्यस्तरीय अधिवेशन,तेली समाजाचे आमदार तसेच इतर मान्यवरांचा भव्य सन्मान सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे. या सन्मान सोहळ्यात श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्यावर आधारित असलेल्या गीतांचे उत्कृष्ट असे सुप्रसिद्ध गायक राज प्रल्हाद रायते यांचा भव्य सत्कार समारंभ आयोजित आला आहे.**

या कार्यक्रमात सर्व समाज



बांधव आणि मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत, तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष,तथा अखिल भारतीय तैलिक साहु मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष, माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षिरसागर यांचा कायम भक्कम पाठिंबा व आशिर्वाद राज रायते यांच्या पाठीशी आहे. राज रायते यांना या कार्यक्रमाचे आमंत्रण स्वतः नागपूर वरून बीड ला येऊन

## सुभाषराव गायगवे यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव येथील तेलाचे प्रतिष्ठित व्यापारी सामाजिक कार्यकर्ते सुभाषराव अण्णा गायगावे वय ६८ यांचे अल्पशा आजाराने दिनांक १० मे रोजी दुपारी ४:३० वाजता दुःखद निधन झाले आहे त्यांच्या पार्थिवावर दिनांक ११ मे रोजी सकाळी ८ वाजता मंगलनाथ स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

सुभाषराव अण्णा गायगाव हे अत्यंत मनमिळावू शांत धार्मिक वृत्तीचे होते आडत व्यापारी तेलाचे व्यापारी म्हणून सर्वत्र परिचित होते गजानन गणेश मंडळाचे हे संस्थापक सदस्य होते कुणाच्याही सुख दुःखात सहभागी होणारे व्यक्तिमत्व म्हणून सर्वत्र परिचित होते सामाजिक



कार्याची त्यांना आवड होती त्यांचे अल्पशा आजाराने दिनांक १० मे रोजी दुपारी ४:३० वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी दुःखद निधन झाले आहे त्यांच्या पार्थ यावर आज दिनांक ११ मे रोजी सकाळी ८ वाजता मंगलनाथ स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, दोन बहिणी, दोन मुले, दोन मुली,सुना नातवंडे असा परिवार आहे.



**बीड : महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना आयोजित एक तास देशासाठी. व शहीद जवान यांना श्रद्धांजली अर्पण करून देशासाठी लढणाऱ्या जवानांसाठी एक तास देशासाठी. भारतीय लष्करातील जवानांचे मनोबल वाढवण्यासाठी बीडकर एकत्र आले. बीड जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी सगळ्यांना संबोधित केले. यावेळी बीड शहरातील प्रतिष्ठित नागरिकासह सामाजिक कार्यकर्ते. विविध संघटना पक्षाचे कार्यकर्ते. पोलीस दलातील अधिकारी- कर्मचारी यांची मोठी उपस्थिती होती.**

## शहीद झालेल्या भारतीय जवानाच्या स्मरणार्थ वंचितचे रक्तदान शिबिर

बीड । प्रतिनिधी

बीडमध्ये वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा वाढदिवस ३ मे ते १० मे स्वाभिमान दिवस साजरा केला जातो. परंतु यावर्षी प्रकाश आंबेडकर यांनी कार्यकर्त्यांना सूचना केली की यावर्षी माझा वाढदिवस साजरा करू नये केक कापू नये व फटाके फोडू नये त्या ऐवजी ''पहलगाम आतंकी हल्यात मृत्यू झालेल्या नागरिकांच्या आणि पाकिस्तानी सैन्याच्या गोळीबारात शहीद झालेल्या भारतीय जवानांच्या स्मरणार्थ रक्तदान शिबिराचे आयोजन करावे'' अशी सूचना ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी दिल्या होत्या.

बीड येथे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी शासकीय रुग्णालय बीड या ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन केले संदेश



### ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी वाढदिवसानिमित्त दिलेल्या सूचनांचे पदाधिकाऱ्यांकडून पालन

डोळस , भारिप युवक अध्यक्ष संतोष जोगदंड, ज्येष्ठ नेते राहुल वडमारे, युवा कार्यकर्ता सुमित उजगरे, तालुका संघटक आकाश साबळे, प्रवीण गायकवाड, नितीन कांबळे, प्रेम कांबळे यांनी रक्तदान केले. यावेळी सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, जिल्हाध्यक्ष अनिता चक्रे, जिल्हाउपाध्यक्ष पुष्पाताई तूरूकमाने, सोनाजी सोनवणे, मिलिंद सरपते यांच्यासह बरेच पदाधिकारी हे रक्तदान करण्याचे राहिले असून रविवारी व सोमवारी रक्तदान करणार आहेत अशी माहिती वंचित जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी दिली.

# जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेचा वटवृक्ष बंकटस्वामींनी केला - राष्ट्रसंत भास्करगिरी महाराज

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय ही बंकटस्वामी महाराजांची कृपा आहे. आळंदी येथील जोग महाराज यांनी स्थापन केलेल्या वारकरी शिक्षण संस्थेचा वटवृक्ष करण्याच काम स्वामी महाराज यांनी केले. असे प्रतिपादन राष्ट्रसंत शांतीब्रम्ह सद्गुरू भास्करगिरीजी महाराज देवगडकर यांनी केले. संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवास भेट दिली असता ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज, श्री ह भ प महंत किसन महाराज पवार, श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प सुरेश म जाधव यांच्यासह हजारो



भाविक भक्त उपस्थित होते.

श्री क्षेत्र नेकनूर संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात श्री क्षेत्र देवगड येथील राष्ट्रसंत शांतीब्रम्ह सद्गुरू भास्करगिरीजी महाराज यांनी आशीर्वादात्मक भेट दिली यावेळी बोलताना. संत बंकटस्वामी महाराज यांच्या चरित्रातील आठवणी सांगितल्या तसेच स्वामीच्या कार्यालचा उल्लेख करताना. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय ही बंकटस्वामी महाराजांची कृपा आहे.. किर्तन कसे करावे ,भजन कसे करावे ,काकडा भजन कसा असल पाहिजे. कोणता अभंग कधी म्हणावा, मृदंग कसा वाजवावा, यासह कीर्तनाची अलिखित आचारसंहिता स्वामींनी दिली.. आदिशक्ती मुक्ताईच्या स्थळाचे संशोधन संत नामदेव महाराजांच्या अभंगाच्या माध्यमातून बंकटस्वामी महाराजांनी केले त्यामुळे आज आपल्याला मुक्ताईच्या ठिकाणाचे दर्शन करता येते..स्वामी महाराज यांनी तापी तीरावर १ महिनाभर भव्य अखंड हरिनाम सप्ताह केला तो आदर्श होता. भव्य दिव्यता आज साधन असून तेवढी होऊ शकत नाही. जोग महाराज यांनी संस्था काढली.जोग महाराज संस्थेचा वटवृक्ष स्वामी महाराज यांनी केला.संत बंकटस्वामी महाराज यांचे भजन खूप गोड होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बार्टी संस्थेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिलासा; मानधनात इतक्या टक्क्यांची

**पुणे । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण (बार्टी) संस्थेत गेल्या १२ वर्षांपासून मानधनावर काम करणार्या कंत्राटी कर्मचार्यांच्या महागाई भत्त्यानुसार ४६ टक्के वाढ करण्यात आली आहे. हे कर्मचारी अनेक वर्षापासून मानधनावर काम करत आहेत. यावाढीमुळे त्यांना दिलासा मिळाला आहे. असे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले.

मंत्री शिरसाट म्हणाले, वाढत्या महागाईमुळे निर्माण झालेल्या आर्थिक अडचणी लक्षात घेता ही वाढ अत्यंत आवश्यक होती. या निर्णयामुळे जात पडताळणी कार्यालये, बार्टी मुख्यालय, उपकेंद्रे तसेच सामाजिक न्याय विभागांतर्गत असलेल्या कंत्राटी कर्मचार्यांच्या मानधन वाढ या मागणीवर समाधानकारक तोडगा निघाला आहे. कर्मचार्यांच्या हितासाठी घेतलेला हा निर्णय म्हणजे सामाजिक न्यायाची खरी अंमलबजावणी असल्याची भावना सर्व कर्मचार्यांनी व्यक्त करुन सामाजिक न्याय मंत्री शिरसाट यांचे आभार मानले आहेत.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) येथे कार्यरत असलेल्या बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचार्यांच्या मानधनात मागील १२ वर्षांपासून कोणतीही वाढ झालेली नाही.बार्टीमध्ये सुमारे १२०० कर्मचारी कार्यरत आहेत. हे कर्मचारी स्मार्ट सर्विसेस प्रा. लि. या बाह्यस्त्रोत कंपनीमार्फत सफाई कर्मचारी, वाहन चालक, कार्यालय सहाय्यक, डेटा एन्ट्री ऑपरेटर, आस्थापना सहाय्यक, संशोधन अधिकारी, प्रकल्प अधिकारी, सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक, प्रकल्प व्यवस्थापक, समतादूत व तालुका समन्वयक अशा विविध पदांवर कार्यरत आहेत. हे कर्मचारी बार्टीच्या मुख्यालयासह महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, येवला येथील मुक्तिभूमी, नागपूर विभागीय कार्यालय आणि राज्यातील सर्व जिल्हा जात पडताळणी समित्यांमध्ये कार्यरत आहेत. संस्थेमार्फत राबविण्यात येणार्या विविध योजनांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य जनतेपर्यंत पोहोचवणे आणि शासनाकडून मिळणार्या ३०० कोटी रुपयांच्या वार्षिक निधीचा योग्य विनियोग करणे यांसारख्या महत्त्वाच्या कामांमध्ये या कर्मचार्यांचा मोठा सहभाग आहे.

कर्मचार्यांनी मानधन वाढीबाबत वेळोवेळी संस्थेचे महासंचालक सुनील वारे आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री संजय शिरसाट यांना निवेदने दिली आहेत. या संदर्भात मंत्र्यांसोबत बैठका होऊनही ठोस निर्णय न झाल्याने कर्मचार्यांनी १३ फेब्रुवारी २०२५ रोजी काम बंद आंदोलन सुरू केले होते. तेव्हा महासंचालक सुनील वारे यांनी फेब्रुवारीच्या मानधनात वाढ करण्याचे आणि मार्चमध्ये सुधारित वेतन देण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

वेतन वाढीबात यापूर्वी शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे आणि २०२१ मध्ये निविदा प्रक्रिया देखील राबविण्यात आली होती. माजी नियामक मंडळाच्या ३६ व्या बैठकीत डिसेंबर २०२४ मध्ये पुन्हा पोर्टलवर मानधन वाढीसह पुरवठादार निवड प्रक्रियेसाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यामुळे मागील १२ वर्षांपासून प्रलंबित असलेला बाह्य कर्मचार्यांच्या मानधन वाढीचा प्रश्न अखेर मार्गी लागलेला आहे . प्रशासनाने सर्व तांत्रिक बाजू आणि महागाई भत्ता विचारात घेऊन ही मानधन ४६% ने वाढ मंजूर केली आहे. ही वाढ १ मार्च २०२५ पासून लागू करण्यात आली आहे. बार्टी ही महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था आहे. राज्यातील इतर सामाजिक न्याय विभागाच्या संस्था जसे की सारथी, महाज्योती आणि आर्टी येथील बाह्यस्त्रोत कर्मचार्यांच्या मानधनात वाढ झाली आहे आणि त्यांना सध्याच्या वेतनश्रेणीनुसार वेतन मिळत आहे. मात्र बार्टीतील कर्मचार्यांच्या मानधनात गेल्या १२ वर्षांपासून कोणतीही वाढ न झाल्यामुळे त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला होता.

# संगणक अभियंता तरुणीची १४ लाख रुपयांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

ऑनलाइन पद्धतीने काम मिळवून देण्याचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी संगणक अभियंता तरुणीची १४लाख रूपयांची फसवणूक केली. याप्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध आंबेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याप्रकरणी २९ वर्षीय तरुणीने आंबेगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुणी आंबेगाव खुर्द परिसरात राहतात. त्या संगणक अभियंता आहेत. १२ ते १७ जुलै २०२४ दरम्यान अनोळखी व्यक्तींनी तरुणीच्या मोबाईलवर संदेश पाठविला. ऑनलाइन पद्धतीने घरातून काम केल्यास दररोज दोन ते तीन हजार रुपये मिळतील.समाज माध्यमातील चित्रफिती, तसेच मजकुरास दर्शक पसंती मिळवून दिल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष तरुणीला दाखविण्यात आले. तरुणीने प्रतिसाद दिल्यानंतर सायबर चोरट्यांनी तरुणीस ऑनलाइन काम (ऑनलाइन टास्क) दिले.महिलेने संबंधित काम पूर्ण केल्यानंतर तिला परताव्यापोटी चार हजार ९२० रुपये देत महिलेचा विश्वास प्राप्त केला. त्यानंतर संबंधित कामामध्ये गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखवत तरुणीला जाळ्यात ओढण्यात आले. त्यानंतर तरुणीने सायबर चोरट्यांनी दिलेल्या बँक खात्यात आठ महिन्यात १४ लाख २५ हजार रुपये पाठविले. त्यानंतर परतावा मिळण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तरुणीने आंबेगाव पोलिसात फिर्याद दिली. या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक शरद झिणे करत आहेत.

# नदी स्वच्छतेची जबाबदारी शासनाची; इंद्रायणीच्या प्रदूषणाबाबत एकनाथ शिंदेंचा वारकऱ्यांना शब्द

**पुणे । प्रतिनिधी**

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त आयोजित हरिनाम सप्ताहाला राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी हजेरी लावली होती. संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या मंदिराशेजारील भक्त निवासाचे काम तातडीने सुरू करावे. त्यासाठी नगरविकास विभागाकडून २५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जाणार असल्याची महत्वपूर्ण घोषणा शिंदे यांनी यावेळी बोलताना केली. तसेच भक्त निवासामुळे वाकऱ्यांची सोय होणार असून दिलेला शब्द मी पाळतो असे म्हणत निधीची चिंता करू नये, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.



साडेचारशे एकर जागेमधील ज्ञानभूमीचे काम टप्प्याटप्प्याने सरकारच्या मदतीने केले जाईल. महायुतीचे सरकार वाकऱ्यांमुळे आले आहे. त्यामुळे आळंदीत जे काही करायचे ते काम केले जाईल. गेली ७५० वर्षे ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात वाटचाल सुरू आहे. मानवता, सेवाभाव आणि योगसाधनेचे महत्त्व ज्ञानेश्वरीने सांगितले आहे, असे देखील शिंदे म्हणाले.

आळंदीतील इंद्रायणी नदीच्या प्रदुषणाविषयी देखील शिंदे यांनी भाष्य केले. ते म्हणाले, इंद्रायणी नदी प्रदुषणमुक्त, स्वच्छ झाली पाहिजे अशी वाककऱ्यांची इच्छा आहे. केंद्र आणि राज्य सरकार मिळून नदी स्वच्छतेचे काम करेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी नदी स्वच्छ करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. नदी स्वच्छतेची जबाबदारी शासनाची आहे. जे काय लागेल ते केले जाईल. पण इंद्रायणी नदी स्वच्छ, शुद्ध, प्रदुषणमुक्त केली जाईल, नदी स्वच्छतेच्या कामाला या वर्षी प्रारंभ होईल, अशी ग्वाही शिंदे यांनी दिली.

यावेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार विजय शिवतारे, उत्तम जानकर, आळंदी देवस्थानाचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ, पालखी सोहळाप्रमुख डॉ. भावार्थ देखणे उपस्थित होते.

# शिवसनेच्या खासदाराने मुख्यमंत्री फडणवीसांची घेतली भेट; केली 'ही' मोठी मागणी

**पिंपरी । प्रतिनिधी**

पुणे-लोणावळा या रेल्वे मार्गाच्या तिसऱ्या व चौथ्या ट्रॅकच्या कामाला केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. यासाठी राज्य सरकारची ५० टक्के हिश्याची रक्कम तातडीने द्यावी. त्यामुळे काम सुरु करण्याचा मार्ग मोकळा होईल. निधी तत्काळ देण्याची मागणी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केली आहे. याबाबत खासदार बारणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यांना तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकची सविस्तर माहिती दिली. त्यासाठीचा राज्य सरकारचा हिस्सा तातडीने देण्याची मागणी करण्यात येत आहे.



खासदार बारणे म्हणाले की, गेल्या तीन दशकांपासून पुणे, लोणावळा दरम्यान तिसरा व चौथा ट्रॅक व्हावा यासाठी पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांची मागणी आहे. २०१४ मध्ये मी निवडून आल्यानंतर त्यासाठी पाठपुरावा सुरु केला. केंद्र सरकारने २०१५-१६ मध्ये पुणे-लोणावळा लोह मार्गावरील तिसरा आणि चौथ्या ट्रॅक करण्याची घोषणा केली. त्याचा विकास आराखडा (डीपीआर) तयार केला. १५ फेब्रुवारी २०१९ मध्ये रेल्वे बोर्डाने महाराष्ट्र सरकारला प्रस्ताव पाठवला आहे. त्यासाठी २०१७ मध्ये केंद्रीय अर्थसंकल्पात तरतूद देखील केली. याचा ५० टक्के खर्च केंद्रीय रेल्वे विभाग आणि ५० टक्के राज्य सरकार अशी खर्चाची विभागणी आहे. राज्याच्या ५० टक्यांमध्ये पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेचा सहभाग राहणार आहे. अनेक वर्ष हा प्रकल्प रखडला आहे. राज्य सरकारने आपल्या हिश्याचा निधी न दिल्यामुळे प्रकल्पाला विलंब होत आहे. नागरिकाची सोय व लोकल सेवा सुरळीत होण्यासाठी हे ट्रॅक होणे अतिशय आवश्यक आहे. त्यामुळे पुणे – लोणावळा तिसऱ्या व चौथ्या ट्रॅकसाठी राज्य सरकारच्या हिश्याचा निधी तत्काळी मिळावा. तिसरा, चौथा ट्रॅक करण्यासाठी रेल्वेमंत्री अष्विनी वैष्णव हे सहकार्य करित आहेत. मागील आठवड्यात पुणे दौऱ्यावर आले असता त्यांनी या कामाला तत्काळ सुरुवात करण्यासाठी प्रयत्न केले जातील असे सांगितले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांनीही निधी देण्यासाठी सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यामुळे राज्य सरकारचा हिस्सा मिळून लवकरच कामाला सुरुवात होईल, अशी आशा असल्याचे खासदार श्रीरंग बारणे म्हणाले.

# पुण्यातील तरुणीची पाकिस्तानच्या समर्थनार्थ पोस्ट, पोलिसांकडून अटकेची कारवाई; कॉलेजनंही केलं निलंबित

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात वास्तव्यास असलेल्या तरुणीने पाकिस्तान जिंदाबादच्या घोषणा दिल्या आणि सोशल मीडियावर पाकिस्तानच्या समर्थनार्थ पोस्ट केल्याची तक्रार पुणे शहरातील पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. यानंतर पोलिसांनी या तरुणीला अटक केली आहे. शिवाय ही तरुणी पुण्यातील ज्या कॉलेजमध्ये शिकत होती, त्या कॉलेजनेही तरुणीवर निलंबनाची कारवाई केली आहे.



**सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल**

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म द वर सकल हिंदू समाज या पेजने पोस्ट करत या संदर्भात माहिती दिली आहे. पुण्यातील ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. दरम्यान, पोलिसांनी या तरुणीला आता ताब्यात घेतलं आहे. सकल हिंदू समाज यांनी पुण्यात शिकत असलेल्या एका तरुणीने तिच्या सोशल मिडिया हॅण्डल वर पाकिस्तान समर्थनार्थ पोस्ट लिहिली असून पाकिस्तान जिंदाबाद घोषणा लिहल्या आहेत, अशी माहिती प्रसिद्ध केली आहे.

दरम्यान, तक्रार दाखल झाल्यानंतर तरुणीचे इन्स्टाग्राम अकाउंट डिलीट करण्यात आलं आहे. याबाबत सकल हिंदू समाजाने कारवाईची मागणी केली होती. यावरून पुण्यातील पोलिस ठाण्यात या तरुणीवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिस निरीक्षक विनायक पाटणकर यांनी दिली आहे. पाकिस्तानचे समर्थन करणारा आणि पाकिस्तान जिंदाबाद लिहीलेल्या मेसेज व्हाट्सअप ग्रुपमध्ये टाकल्याबद्दल पुण्यातील १९ वर्षांच्या मुलीला अटक करण्यात आलीय. ही मुलगी महाविद्यालयात शिक्षण घेते. सध्या भारत आणि पाकिस्तानमध्ये उद्भवलेल्या युद्धजन्य परिस्थितीमधे भारताने घेतलेल्या भूमिकेबद्दल आक्षेपार्ह मजकूर तीने पोस्ट केलेल्या मेसेजमध्ये होता.

# मेव्हणीच्या विवाहबाह्य संबंधाला विरोध करणाऱ्याचा खून; गुजरवाडी येथील घटना

**पुणे । प्रतिनिधी**

मेव्हणीच्या विवाहबाह्य संबंधाला विरोध करणाऱ्या इस्टेट एजंटचा शुक्रवारी रात्री साडेदहाच्या सुमारास खून करण्यात आला. ही घटना गुजरवाडी रस्त्यावरील पवारनगर येथे घडली. याप्रकरणी चुलता आणि पुतण्याला अटक करण्यात आली आहे. मनोहर दिनकर शिंदे (४६,रा. पवारनगर, गुजरवाडी रोड, मांगडेवाडी, कात्रज ) असे मृताचे नाव आहे.

याप्रकरणी रोहित उर्फ बुधाजी मारुती असोरे ( ३२) आणि केशव मोतीराम आसोरे (२६, दोघे रा. खोपडे नगर, गुजर निंबाळकरवाडी) यांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, मनोहर शिंदे यांच्या मेव्हणीचे आरोपी रोहित बरोबर अनैतिक संबंध होते. रोहित हा पुर्वी रिक्षा चालवायचा, नंतर त्याने टुरिस्टचा व्यवसाय सुरु केला होता. मनोहर यांचा दोघांच्याही अनैतिक संबंधांना विरोध होता. यामुळे त्यांच्यामध्ये अनेकदा वाद होत होते. दरम्यान शुक्रवारी रात्री रोहितने त्याच्या दोन तीन मित्रांना घेऊन मनोहरला पवारनगर येथे गाठले.

तेथे ज्ञानदा अपार्टमेंटच्या समोर लाथा-बुक्क्यांनी आणि बांबुने मारहाण केली. बांबुचा वार डोक्यावर वर्मी लागल्याने मनोहरचा मृत्यू झाला. घटना कळताच भारती विद्यापीठ पोलिसांनी धाव घेतली. त्यांनी आरोपींच्या मागावर दोन पथके रवाना केली. यातील मुख्य आरोपी रोहितला पुण्यातून तर केशवला बीडे येथील गेवराई येथून ताब्यात घेतले आहे. याप्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक सावळाराम साळगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

# गिरिप्रेमीच्या जितेंद्र गवारे यांची मकालू मोहिम यशस्वी; सात ८००० मीटर शिखरांवर चढाई करणारे पहिले महाराष्ट्रीयन गिर्यारोहक

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र व भारताच्या गिर्यारोहण क्षेत्रासाठी आज अत्यंत अभिमानाचा व आनंदाचा दिवस आहे. गिरिप्रेमीचे अनुभवी गिर्यारोहक जितेंद्र गवारे यांनी १० मे २ रोजी सकाळी ४:५० वाजता (स्थानिक वेळेनुसार) यशस्वीपणे माउंट मकालू (८,४८५ मीटर) शिखरावर यशस्वी चढाई केली. या पराक्रमासह, ते सात ८००० मीटर शिखरांवर चढाई करणारे पहिले महाराष्ट्रीयन गिर्यारोहक ठरले आहेत. त्याचबरोबर, नेपाळ हिमालयातील सर्व आठ-हजार मीटर शिखरांवर चढाई करणार्या मोजक्या भारतीय गिर्यारोहकांमध्ये त्यांचा समावेश झाला आहे.



जितेंद्र यांनी माउंट एव्हरेस्ट, माउंट कांचनजुंगा, माउंट ल्होत्से, माउंट धौलागिरी, माउंट मनासलू, माउंट अन्नपूर्णा-१ व आज माउंट मकालू अशा सात शिखरांवर चढाई केली आहे. या सातत्यपूर्ण यशामागे त्यांची चिकाटी, कौशल्य आणि गिर्यारोहणाची निष्ठा आहे. त्यांना यापूर्वी महाराष्ट्र शासनाने शिवछत्रपती पुरस्कारने सन्मानित केले आहे.

या यशस्वी प्रवासामागे दिग्गज गिर्यारोहक आणि तेनसिंग नोर्गे राष्ट्रीय साहस पुरस्कारप्राप्त उमेश झिरपे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. या विशेष प्रसंगी उमेश झिरपे म्हणाले, जितेंद्रची समर्पणाची भावना, नम्रता आणि शिस्त सदैव उल्लेखनीय राहिली आहे. आजचे त्यांचे यश केवळ वैयक्तिक नाही, तर महाराष्ट्राच्या गिर्यारोहण इतिहासातील एक सुवर्णक्षण आहे. त्याच्या या प्रवासात मार्गदर्शक होण्याचा मला अभिमान आहे. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ यांनी जितेंद्र यांच्या मकालू मोहिमेस पाठबळ दिले. विद्यापीठाचे माननीय कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांनी विशेष पाठिंबा व प्रोत्साहन दिले, ज्यामुळे हे स्वप्न प्रत्यक्षात उतरू शकले.

# खेलो इंडिया युवा स्पर्धा : वेटलिफ्टिंगमध्ये आकांक्षा व्यवहारेला सुवर्ण

**पुणे । प्रतिनिधी**

नाशिकच्या मनमाडमधील व्यवहारे कुटुंबियांनी खेलो इंडिया युवा स्पर्धेत सुवर्ण पदक जिंकण्याची परंपरा बिहारमध्येही कायम राखली. ७ व्या खेलो इंडिया युवा स्पर्धेत आकांक्षा व्यवहारेने ४५ किलो गटात सुवर्ण, तर ठाणेच्या वेदिका टोळेने कांस्य यशाला गवसणी घातली.

राजगीर क्रीडा विद्यापीठाच्या परिसरात सुरू असलेल्या वेटलिफ्टिंग खेळातही पहिल्या दिवसापासून महाराष्ट्राचा डंका पहाण्यास मिळाला. ४५ किलो गटात ९ पैकी ३ स्पर्धेक महाराष्ट्राचे होते. अपेक्षेप्रमाणे आकांक्षाने एकूण १४८ किलो वजन उचलून सोनेरी यश पटकावले. १२७ किलो वजनाची कामगिरी करीत वेदिका टोळेने तिसरे स्थान प्राप्त केले.



आकांक्षाचे हे खेलो इंडिया स्पर्धेतील दुसरे पदक आहे. मध्यप्रदेशमधील २०२३ स्पर्धेत तीने सुवर्णपदक जिंकले होते. गत स्पर्धेत दुखापतीमुळे चौथ्या स्थानावर तीची कामगिरी होती. बिहार स्पर्धेत दुखापतीवर मात करून तीने पदकाचा करिश्मा घडविला.

स्नॅच प्रकारात अपेक्षेप्रमाणे आकांक्षाने दमदार सुरूवात केली. तिसऱ्या प्रयत्नात सर्वाधिक ६८ किलो वजन उचलून आकांक्षाने आपले वर्चस्व गाजवले. पाठोपाठ क्लिन अँन्ड जर्क प्रकारातही सर्वाधिक ८० किलो वजन उचलून आकांक्षाने सुवर्णपदकावर नाव कोरले. वेदिकाने स्नॅच प्रकारात ६० किलोची कामगिरी करीत दुसरे स्थान मिळवले होते. क्लिन अँन्ड जर्क प्रकारात ७० गुणांसह ती मागे पडली. केवळ १ गुणांनी तिचे रौप्य पदक हुकले. पंजाबच्या लव्हजोत कौरने १२८ गुण संपादून रौप्यपदकाचे यश संपादन केले. नाशिकच्या जय भवानी व्यायाम शाळेत सराव करणाऱ्या आकांक्षा ५ आंतरराष्ट्रीय स्पर्धा खेळल्या आहे. तीने १९ वर्षांखालील गटात राष्ट्रकुल स्पर्धेत पदक जिंकले आहे. प्रविण व्यवहारे यांच्या मार्गदर्शनाखाली ती सराव करते. खेलो इंडिया स्पर्धेतील ४५ किलो गटातच मला ऑलिम्पिक पदक जिंकायचे असल्याचे आकांक्षाने सांगितले. मनमाडमधील व्यवहारे कुटुंबियांनी सलग तिसऱ्या स्पर्धेत सुवर्ण पदक जिंकण्याची किमया घडविली आहे. गतवर्षी आकांक्षाचा भाऊ कृष्णाने सुवर्णपदक पटकावले होते. वेदिका टोळे हीचे आई वडील हे दोघेही वेटलिफ्टर खेळाडू आहेत. सांगलीच्या राष्ट्रीय पदक विजेत्या खेळाडू असलेल्या मधुरा सिंहासने यांची ती मुलगी आहे. आवड व सुदृढतेसाठी मी वेटलिफ्टिंग खेळते, खेलो इंडियातील हे पदक माझ्यासाठी बोनस असल्याचे वेदिकाने सांगितले.

# कृषी क्षेत्रात अन्नधान्याचा साठा वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे: मंत्री जयकुमार रावल

**पुणे । प्रतिनिधी**

नुकतीच राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी पुण्यात पणन कृषी कार्यालयात विभागाचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली होती. यानंतर महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ संचालक मंडळाच्या बैठक रावल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत त्यांनी वखार महामंडळाच्या गोदामामध्ये धान्य ठेवण्यासाठी शेतकऱ्यांचा विश्वास आणि इच्छा वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच धान्य गोदामांमध्ये आढळून आलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी सूचना केल्या आहेत.

राज्यात वखार महामंडळाचे १७.२ लाख मेट्रिक टन क्षमतेने स्व मालकाची साठवणूक क्षमता असलेले गोदामे आहेत. तसेच भाडेतत्वावरील ७.२२ लाख मेट्रिक टन असे २४ लाख मेट्रिक टन आहे. त्यामध्ये सुमारे ५२ हजार मेट्रिक टन साठवणूक क्षमतेचे गोदाम निर्मितीसंदर्भात व्यवहार्याचे नियोजन करावे,



राज्यातील गोदामांचे रेटिंग करून घ्यावे जेणेकरून केंद्र सरकारच्या सवलतींचा लाभ घेता येईल, अशा सूचना मंत्री जयकुमार रावल यांनी अधिकाऱ्यांना केल्या आहेत.

शेतकऱ्यांच्या साठवणूक भाड्यामध्ये ५० टक्के आणि शेतकरी उत्पादक संस्थांना २५ टक्के सवलत दिली जाते. साठवणूक केलेल्या मालास १०० टक्के विमा सरंक्षण तसेच शेतमाल तारण कर्ज उपलब्ध करून दिले जाते. धान्य साठवणूकीमुळे बाजारभाव उच्च उसताना शेतकऱ्यांच्या शेतमालाला चांगला परतावा मिळून त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल, असे त्यांनी यावेळी बोलताना नमूद केले. तसेच शेतकऱ्यांचा शेतीमाल शास्त्रशुद्ध पद्धतीने साठविण्यासोबतच कृषी क्षेत्रात अन्नधान्याचा साठा वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे, अशी सूचना देखील त्यांनी केली आहे.

**पारदर्शकता राहण्यासाठी सीसीटीव्ही बसवावेत**

राज्यात असेलल्या धान्य गोदामामध्ये सनियंत्रण टिकून राहण्यासाठी आणि कामकाजात पारदर्शकात राहण्याच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवून त्याचे नियंत्रण कक्ष पुणे येथील वखार महामंडळाच्या कार्यालयात करावे. यामुळे राज्यातील गोदामात उपलब्ध धान्य साठवणूक क्षमतेपेक्षा अधिक साठवणूक क्षमता वाढ होण्यास मदत होईल, असे देखील रावल यांनी स्पष्ट केले. या बैठकीला महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक कौस्तुभ दिवेगावकर, सहव्यवस्थापकीय संचालक दीपक शिंदे यांच्या अधिकारी उपस्थित होते.